

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# विद्यावार्ता

सप्टेंबर २०२६

ई - मासिक



RAJARSHI SHAHU COLLEGE OF ENGINEERING BULDHANA

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY AMRAVATI

SHRI SANT GAJANAN MAHARAJ COLLEGE OF PHARMACY BULDHANA

युवा संस्पर्श

युवा महोत्सव 2026 YOUTH FESTIVAL

युवा शक्ति, सृजनशीलता, एकता

## युवा संस्पर्श

## युवा महोत्सव - २०२६

# विद्यावार्ता
ई - मासिक


# अनुक्रमणिका


- विद्यापीठाच्या 'युवा संस्पर्श – २०२६' युवा महोत्सवाचे बुलढाण्यात थाटात उद्घाटन १
- विद्यापीठात प्रथम कुलगुरु डॉ.के.जी. देशमुख व्याख्यानमाला संपन्न ६
- विद्यापीठात प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला संपन्न ८
- विद्यापीठात तिसरे महानुभाव साहित्य संमेलन १०
- विद्यापीठात 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' विषयावर व्याख्यान संपन्न १४
- तिस–या महानुभाव साहित्य संमेलनाचा समारोप १६
- विद्यापीठामध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप १७
- विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवड चाचणी शिबीराचे उद्घाटन संपन्न १९
- विद्यापीठात दीक्षारंभ २०२६ कार्यक्रम उत्साहात संपन्न २१
- विद्यापीठाची कवी केशवसुत काव्यस्पर्धा उत्साहात संपन्न २२
- विद्यापीठाच्या सी.एम.डी.आर. ला विदेशी शिष्टमंडळाची भेट २४
- विदेशी संशोधकांची विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाला भेट २५
- 'डॉकिंग वर्कबेंच' वेब अप्लिकेशनचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते थाटात लोकार्पण २६
- गृहविज्ञान विभागात 'राष्ट्रीय पोषण माह २०२६' चे थाटात उद्घाटन २७
- परतवाडा येथील स्व. छगनलाल कढी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची स्कुल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाला शैक्षणिक भेट २८
- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेत सेवानिवृत्ती सत्कार सोहळा संपन्न २९
- विद्यापीठात 'इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड' पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन ३१
- विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागात अभियांत्रिकी दिन उत्साहात साजरा ३२
- विद्यापीठात विश्व संस्कृत दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न ३३
- विद्यापीठातील जीवतंत्रशास्त्र विभागात .. 'ध्येयनिर्मिती : आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' विषयावर व्याख्यान संपन्न ३४
- जयंती विशेष ३५
- बातमी कात्रणे ३८





संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्गदर्शक

डॉ. मिलींद बारहाते

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

डॉ. महेंद्र ढोरे

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

डॉ. अविनाश असनारे

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

डॉ. विलास नांदुरकर

जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

https://www.sgbau.ac.in
E-mail-pro@sgbau.ac.in




# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या 'युवा संस्पर्श - २०२६' युवा महोत्सवाचे बुलढाण्यात थाटात उद्घाटन

## पुस्तकी ज्ञानासोबतच सॉफ्ट स्किल्स व व्यक्तिमत्व विकास महत्वाचा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून सॉफ्ट स्किल्स आणि व्यक्तिमत्त्व विकास अत्यंत महत्वाचा आहे. नोकरी असो वा व्यवसाय, त्यासाठी युवा महोत्सवासारख्या उपक्रमांमधील सहभाग विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करतो, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव 'युवा संस्पर्श – २०२६' चे राजश्री शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलढाणा येथे थाटात उद्घाटन संपन्न झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाला बुलढाणा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री निलेश तांबे, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्दारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशनच्या सचिव श्रीमती पद्माताई सावळे, संस्थेच्या सहसचिव ॲड. कीर्तीताई प–हाड, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. विजय नागरे, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत कावरे, डॉ. विजय बोरकर तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बुलढाणा पोलीस अधिक्षक श्री निलेश तांबे


फित कापून युवा महोत्सवाचे उद्‌घाटन करतांना मान्यवर

विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीचा गौरव करत, विद्यापीठाला मिळालेल्या 'क्यूएस वर्ल्ड रँकिंग' मधील नामांकनाबद्दल सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन करत कुलगुरू पुढे म्हणाले, चार दिवस चालणा-या या युवा महोत्सवात विद्यार्थ्यांना आपल्यातील कलागुणांचे सादरीकरणासह नवीन मित्र-मैत्रिणी जोडण्याचे व्यासपीठही उपलब्ध झाले आहे. व्यासपीठावर येऊन आपली कला सादर करणे, हीच यशाची पहिली पायरी आहे. या महोत्सवातील विविध स्पर्धांचे मूल्यमापन अत्यंत पारदर्शक आणि वस्तुनिष्ठ पध्दतीने केले जाणार आहे. यातून निवडले जाणारे गुणवंत संघ पुढे राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करतील. गेल्या वर्षी राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक व इतर पारितोषिके मिळवून विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे याच पारदर्शक निवडीचे फलित आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या कला पूर्ण क्षमतेने सादर करून या महोत्सवाचा आनंद घ्यावा, या आवाहनासह सहभागी विद्यार्थ्यांना कुलगुरूंनी शुभेच्छा दिल्यात.

बुलढाणा पोलीस अधीक्षक श्री निलेश तांबे यांनी स्पर्धेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करून पुढे म्हणाले, या युवा महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विविध सांस्कृतिक व कलात्मक स्पर्धांचा थरार या ठिकाणी रंगणार आहे. संलग्नित महाविद्यालयांमधून सहा हजाराहून अधिक विद्यार्थी या महोत्सवात सहभागी होत आहेत. विद्यार्थ्यांनी पुस्तकीय ज्ञानासोबतच व्यावहारिक ज्ञान व निरिक्षण कौशल्यावर भर दिला पाहिजे. या मंचाचा वापर करून स्वतःमधील सूप्त गुण ओळखावेत आणि वैयक्तिक स्पर्धांसोबतच संघटित राहून काम करण्याची भावना जपावी, असे आवाहन त्यांनी केले. ते पुढे म्हणाले, सध्या डिजिटल आणि एआय च्या युगात तांत्रिक प्रगतीसोबतच आव्हानेही वाढली आहेत. युवा पिढीने कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून आणि नशाखोरीपासून दूर राहिले पाहिजे. प्रत्येकाने सजग राहून नशामुक्त जीवन जगण्याची शपथ घ्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना व आयोजकांना शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी ॲड. कीर्तीताई प-हाडे यांनी मनोगत व्यक्त केले.


कार्यक्रमाला उपस्थिती


दीपप्रज्वलन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर

**विद्यार्थ्यांना मान्यवरांच्याहस्ते उत्कृष्ट पुरस्काराचे वितरण**

यांप्रसंगी बेस्ट एन.सी.सी. कॅडेट पुरस्कार मुलांमधून हर्षल किरण पाटील, जी.एस. महाविद्यालय, खामगाव तर मुलींमधून विद्याभारती महाविद्यालय अमरावतीची कु. श्रावणी प्रमोद आपोतीकर हिला, उत्कृष्ट कलावंत पुरस्कार डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावतीच्या श्री निखिल बाळू सखे याला, तर सिपना अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीची कु. निहाल लक्ष्मीकांत आसोपा हिला प्रत्येकी दहा हजार रुपये रोख पुरस्कार देऊन, तर आदर्श विद्यार्थी पुरस्कार रुपये १५०००/- रोख स्वरूपाचा ब्रजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावतीचा वेध विवेक बारलिंगे, तर शंकरलाल खंडेलवाल कला व विज्ञान महाविद्यालय, अकोलाची कु. प्रणाली विनोद पिंपळकर हिला मान्यवरांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

यांप्रसंगी 'उत्कृष्ट विद्यार्थी विकास अधिकारी पुरस्कारा'ने डॉ. लक्ष्मीकांत काळपांडे, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा, प्रा. शुभम ठाकरे, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावती, डॉ. नेत्राजी मानकर, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, डॉ. सागर गवई, स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा, जि. बुलढाणा, डॉ. तक्षशिला मोटघरे, महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ आणि डॉ. रवींद्र मडावी, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशीम यांचा मान्यवरांच्याहस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, वंदे मातरम व महाराष्ट्र गीताने झाली. प्रास्ताविक डॉ. राजीव बोरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री रणजित राजपूत यांनी, तर आभार प्रा. प्रमोद काटकर यांनी मानले. या युवा महोत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येत्या चार दिवसांत तब्बल २८ विविध कला प्रकारांचे सादरीकरण केले जाणार असून हजारो तरुण कलावंत आपली कला सादर करून या महोत्सवाचा मंच गाजवणार आहेत.

या युवा महोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. निखिलेश नलोडे यांच्यासह डॉ. सावन देशमुख, डॉ. नेत्रा मानकर, डॉ. प्रशांत बागडे, प्रा. सूरज हेरे, डॉ. सीमा देशमुख, डॉ. शर्मिला देशमुख यांनी परिश्रम घेतले. तसेच श्री. अरुणभाऊ चव्हाण, डॉ. शिरीष जैन, डॉ. हर्षद केला, डॉ. विजय बोरकर, प्रा. मोहसीन खान, प्रा. पवन जगताप, प्रा. सुजित पाटील, प्रा. नरवाडे, डॉ. राणे आणि डॉ. ठाकुर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, तंत्रज्ञ आणि विद्यार्थी, बुलढाणा शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विविध कलाप्रकारात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलांची क्षणचित्रे












अमरावती विद्यापीठ, अमरावती
सेवा संकल्प अभियान अंतर्गत
NASHA MUKT YUVA VIKSIT BHARAT





# कौशल्य विकास आणि स्वायत्ततेवर विशेष भर देणे काळाची गरज - प्राचार्य अनिल राव

# प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख व्याख्यानमाला संपन्न






अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

सध्याच्या बदलत्या जागतिक प्रवाहात उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. पारंपारिक शिक्षण पद्धती आणि पदव्यांच्या पलीकडे जावून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रोजगाराभिमुख आणि कौशल्यपूर्ण बनवणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यबल गटाचे सदस्य तथा वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अनिल राव यांनी केले. विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी 'उच्च शिक्षण : वेध परिवर्तनाचा' या विषयावर व्याख्यान देतांना प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, सचिव श्री विजय ठाकरे, सदस्य श्री हेमंत काळमेघ, श्री खोटरे, माजी कुलसचिव प्रा.सी.डी. देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख व विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना प्राचार्य अनिल राव म्हणाले, आजच्या काळात सर्व माहिती एका क्लिकवर विद्यार्थ्यांना उपलब्ध होते. त्यामुळे शिक्षकांनी केवळ शिक्षणावर भर न देता फॅसिलेटर आणि मेन्टॉरची भूमिका सुद्धा पार पाडली पाहिजे. पारंपारिक शिक्षणपद्धतीकडे विद्यार्थ्यांचा ओढा आज कमी झाला आहे. त्याच्या रोजगारासाठी त्याला नेमकी कुठली कौशल्य आवश्यक आहे, तशाप्रकारचे कौशल्य देणारे शिक्षण व अभ्यासक्रम निश्चित करुन विद्यार्थ्यांना शिक्षण देणे आजची गरज बनली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नेमकेपणाने त्यावरच भर दिलेला आहे. स्थायी नोकऱ्या आता संपुष्टात येत असून युवकांनी स्वयंपूर्ण होण्यासाठी लाईफ लॉंग लर्निंगवर भर देणे आवश्यक आहे.

सध्याच्या उच्च शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांची संख्या आणि जीईआर वाढत असला तरी पारंपारिक अभ्यासक्रमाचे महत्व आणि आकर्षण मात्र झपाट्‌याने कमी होत चालले आहे. कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पारंपारिक अभ्यासक्रमापेक्षा कौशल्याधारित अभ्यासक्रमाकडे त्यांचा ओघ वाढलेला आहे. कार्ल मार्क्सच्या विचारानुसार पोटाच्या भाकरीची भूक भागल्याशिवाय केवळ तात्विक शास्त्रीय शिक्षण माणसाचे आयुष्य सुखी करु शकत नाही. आजच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना थेट रोजगार मिळवून देणारे आणि त्यांच्या जगण्याची भूक भागविणारे उपयोजित ज्ञान देणे आवश्यक आहे. आज कृत्रिम पद्धतीचे युग आहे, तो मानवासमोरील फार मोठा धोका आहे. त्यामुळे मानवातील विचार करण्याची, विश्लेषणाची आणि नवीन सर्जनशीलतेची ताकद मंदावत चालली आहे. विद्यार्थ्यांना नवीन स्कील देण्यासाठी महाविद्यालयांनी स्वायत्त होवून विद्यार्थ्यांना हवे असलेले अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणे काळाची गरज झाली आहे. अन्यथा आपण मागे राहू, अशी भिती त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.



व्याख्यान देतांना
प्रमुख वक्ते वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अनिल राव

उच्च शिक्षणातील एका दशकाचा आढावा घेतांना त्यांनी आकडेवारीनिशा दिलेली माहिती खूप महत्वपूर्ण आहे. मुलांच्या तुलनेत मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढलेले आहे. याशिवाय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणातील प्रमाण सुद्धा वाढले असून हा देशाचा सामाजिक आणि शैक्षणिक समतेचा एक अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी टप्पा आहे. देशात विद्यापीठे आणि महाविद्यालयांची संख्या झपाट्याने वाढली असली तरी शासकीय सहभाग कमी होवून खाजगीकरणाचा टक्का वाढत आहे. खाजगी विद्यापीठांची संख्या २६१ वरुन ५५६ वर पोहोचली, तर एकूण महाविद्यालयांपैकी जवळपास ५१ टक्के विद्यार्थी आज विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात २०३५ पर्यंत जीईआर चे प्रमाण ३१.५ टक्क्यांवरुन ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शिक्षणाची गुणवत्ता आणि संस्थात्मक स्वायत्तता टिकवून ठेवण्याचे आणि विद्यार्थ्यांना कौशल्याधारित अभ्यासक्रम देण्याचे मोठे आव्हान शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक आणि व्यवस्थापनासमोर आहे. विद्यापीठांनी सुद्धा ह्या बाबी लक्षात घेवून आपली पुढील वाटचाल करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख मनोगत व्यक्त म्हणाले, डॉ.के.जी. देशमुख यांनी १९८३ साली अमरावती विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून सलग नऊ वर्षे यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले गेले. नवीन शैक्षणिक विभागांची स्थापना, नानिन्यपूर्ण क्रेडीट सिस्टीम, वित्तीय संहिता तयार केली. विद्यापीठाला केवळ शैक्षणिकच नव्हे, तर सर्वसमावेशक विकासाच्या मार्गावर नेऊन एक मजबूत पाया त्यांनी रचला, ज्यामुळे विद्यापीठ प्रगतीच्या उच्च शिखरावर पोहोचले. तसेच १९९० मध्ये विद्यापीठाला युजीसीची मान्यता मिळवून देण्यात त्यांचे मोठे योगदान असल्याचेही ते याप्रसंगी म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणाया नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी अमरावती विद्यापीठात सुरु झाली आहे. निती आयोगाच्या अहवालानुसार बीए, बीकॉम आणि बीएस्सी सारख्या पदव्यांना आता कमी रोजगार लिकेंज मिळत असून त्यात सुधारणा करण्याची मोठी गरज आहे. एआय चे आक्रमण टाळता येणार नाही. शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी एआय ला आव्हान न मानता एक वरदान समजून आपली मानसिकता तयार करणे गरजेचे आहे. विद्यापीठाने सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या पाचव्या सत्रात फाऊंडेशन ऑफ एआय हा कोर्स सक्तीचा केला असून त्याचे गुण मार्कशीटवर दर्शविले जाणार आहेत. जुन्या चौकटी मोडून शाश्वत विकास, नैतिक मूल्ये आणि जागतिक बदलांचा वेध घेवून विद्यार्थ्यांना भविष्यातील सक्षम नागरिक बनविण्याची मोठी जबाबदारी प्राध्यापक आणि शिक्षकांवर आहे. विद्यापीठाच्या या उपक्रमामुळे येणाया काळात विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, एआय आणि रोजगाराभिमुख शिक्षणाशी जोडले जाण्यास मोठी मदत होणार असल्याचेही ते म्हणाले.

महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत व संस्था गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात सुरुवातीला शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा व प्रथम कुलगुरु डॉ.के.जी. देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्तविकतेतून विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी व्याख्यानमाला आयोजनामागील भूमिका मांडली. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मंदा नांदुरकर यांनी, तर आभार प्रा. ममता म्हस्की यांनी मानले. कार्यक्रमाला माजी प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, माजी सहसंचालक डॉ. केशव तुपे, प्राचार्य डॉ. दिपक धोटे, प्राचार्य डॉ. विजय भांगडिया, प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे, डॉ. ओमप्रकाश मुंदे, सौ. छायाताई देशमुख, महाविद्यालयाचे अधीक्षक श्री प्रफुल्ल घवळे तसेच संस्थेचे विश्वस्त संचालक, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



श्री शिवाजी शिक्षण संस्थाध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख मार्गदर्शन करतांना



# सुसंस्कृत आणि आनंदी जीवनासाठी संत साहित्याची गरज - डॉ. अलका इंदापवार .. प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला संपन्न




अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व मंचावर उपस्थित मान्यवर

मानवी जीवन जगत असताना अनेक अडचणी, संकटे आणि वैचारिक गोंधळ समोर येतात. अशा वेळी योग्य दिशा दाखवून जीवनाला अचूक मार्ग दाखवण्याचे काम केवळ संत साहित्य आणि थोर संतांचे विचारच करू शकतात, असे प्रतिपादन नागपूर येथील सुप्रसिद्ध वक्ते डॉ. अलका इंदापवार यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालयात संपन्न झाली, त्याप्रसंगी 'श्री गुलाबराव महाराज एक अलौकिक संत' या विषयावर व्याख्यान देतांना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, श्री गणेशदास राठी छात्रालय समिती, अमरावतीचे अध्यक्ष श्री वसंतकुमारजी मालपाणी, माजी न्यायमूर्ती श्री सुदाम देशमुख, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, दानदात्यांचे प्रतिनिधी माजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.एम. भांगडिया व विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. इंदापवार पुढे म्हणाल्या, सामान्य माणसाला जीवन जगण्याचे अंतिम सत्य आणि आत्मिक सुख मिळवून देण्याकरिता संतांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे. दादासाहेब खापर्डे यांनी गुलाबराव महाराजांचा उल्लेख 'चालता–बोलता विश्वकोश' असा केला होता, तर बापूजी अणे यांनी त्यांच्या ग्रंथांमधील अभ्यासाचे कौतुक केले होते. एवढेच नव्हे तर गानकोकिळा लता मंगेशकर यांनी देखील गुलाबराव महाराजांच्या चरित्राची प्रस्तावना वाचताना संतांचे अलौकिक कार्य पाहून आपण थक्क झाल्याचे म्हटले होते. तसेच, गोविंदगिरीजी महाराज यांनी गुलाबराव महाराजांना 'युगाचार्य' असे संबोधत त्यांच्या ग्रंथसंपदेतील अकरा निकषांचा गौरव केला आहे.



सुप्रसिद्ध वक्ते डॉ. अलका इंदापवार व्याख्यान देतांना व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

माणूस अनेकदा भौतिक सुख–सुविधांच्या मागे धावताना स्वतःला आणि आपल्या मूळ अस्तित्वाला विसरून जातो. आपल्याला हवे असलेले खरे सुख आपल्यातच असताना आपण ते जगात चुकीच्या ठिकाणी शोधत असतो. संत तुकाराम महाराजांनी देखील 'तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी' असे सांगितले आहे. आद्य शंकराचार्य असोत, ज्ञानेश्वर महाराज असोत किंवा इतर संत परंपरा, या सर्व महापुरुषांनी कसलाही स्वार्थ न ठेवता केवळ सर्वसामान्य माणसाचे कल्याण व्हावे, मानवी समाज दुःखातून मुक्त व्हावा आणि सर्वांना भगवंताची प्राप्ती करता यावी, यासाठी अहोरात्र कष्ट घेतले. त्यांनी स्वतःच्या सुखाचा त्याग करून समाजाला योग्य दिशा दाखवली. म्हणूनच, आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण युगात संतांचे चरित्र ऐकणे, वाचणे आणि त्यांच्या विचारांचे आचरण करणे, ही काळाची गरज झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली असून अमरावती जिल्ह्यामध्ये अनेक महान संत होऊन गेले. या संतांच्या विचारांचा व साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, यासाठी अशाप्रकारच्या व्याख्यानाच्या आयोजनाचे उद्दिष्ट आहे. डॉ. अलका इंदापवार यांनी विषयाच्या अनुषंगाने गुलाबराव महाराजांच्या विविध ज्ञान क्षेत्रातील योगदानावर सविस्तर विवेचन केले. आळंदी व नागपूर येथे संत गुलाबराव महाराज साहित्य सम्मेलन संपन्न झाले होते, त्या सम्मेलनाला मला उपस्थित राहण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्यच समजतो.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत गुलाबराव महाराज, माता स्वरस्वती व कै. गणेशदासजी राठी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी दानदात्यांचे प्रतिनिधी माजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ.व्ही.एल. भांगडिया, तर प्रास्ताविक विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. संचालन डॉ. राजू वाघ यांनी, तर आभार डॉ. सुनिल मावसकर यांनी केले. कार्यक्रमाला संत गुलाबराव महाराजांचे भाविक भक्त, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थित संत गुलाबराव महाराजांचे भाविक भक्त,
महाविद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिक

# महानुभाव साहित्याचे जतन करणे सर्व मराठी भाषिकांचे कर्तव्य
## उद्घाटक डॉ महेंद्र ढोरे
# तिसरे महानुभाव साहित्य संमेलन



उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

महानुभाव पंथाच्या साहित्य, सर्जनशील लेखन आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीतील महानुभाव पंथाच्या योगदानावर आधारित विविध सत्रे रिद्धपूर येथे उत्साहात पार पडली. या सत्रांमध्ये साहित्यिक, संशोधक, प्राध्यापक आणि महानुभाव विचारांचे अभ्यासक यांनी विविध विषयांवर विचारमंथन केले.

**उद्घाटकीय सत्र**

तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्घाटक तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी यावेळी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्र, विदर्भ साहित्य संघ, शाखा रिध्दपूर, श्रीचक्रधर स्वामी अष्टशताब्दी सोहळा समिती, मोर्शी आणि भारतीय विद्या मंदिर संचालित भारतीय महाविद्यालय, मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने मोर्शी येथील परशुराम पॅलेस येथे आयोजित दोन दिवसीय महानुभाव साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी , प्रमुख अतिथी म्हणून , मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर , विद्यापीठ महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर, भारतीय विद्या मंदिर अमरावती च्या अध्यक्ष .डॉ आराधना वैद्य , न्यायमूर्ती डॉ.कीर्ती कुलकर्णी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, सुभाष पावडे, डॉ. संतोष आगरकर, सत्कारमूर्ती हर्षीकर बाबा शेवलीकर,श्री. विजयराज पंजाबी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**दुसरे सत्र** – महानुभाव पंथाचे वर्तमानकालीन सृजनात्मक साहित्य.

दुपारी २.३० वाजता झालेल्या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी नरसम्मा महाविद्यालय अमरावती येथील मराठी विभागप्रमुख डॉ. अण्णा वैद्य होते. या परिसंवादात महंत श्रीगोपीराज बाबा शास्त्री (नवे), रिद्धपूर, डॉ. भारतभूषणशास्त्री नागपूर तसेच प्रा.मोहन बाबुळगावकर छत्रपती संभाजीनगर यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. अर्चना शिरसाट, अमरावती यांनी केले. या परिसंवादात महानुभाव पंथातील आत्मकथा, कथा, कविता, कादंबरी आणि वैचारिक संशोधन या माध्यमांतून होत असलेल्या समकालीन साहित्यनिर्मितीचा आढावा घेण्यात आला.

**तिसरे सत्र – कवी संमेलन**

दुपारी ४.३० वाजता कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी कवी, लेखक, महंत मयंकराज बाबा सेवातकर होते. यावेळी महंत मुकुंदराज बाबा, नागपूर, डॉ. भगवान साबळे,डॉ. आण्णा वैद्य, श्री ओमप्रकाश ढोरे, भारतभूषण शास्त्री,श्री संदीप साप्ते यांनी कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली.

या कवी संमेलनातून महानुभाव विचार, अध्यात्म, सामाजिक जाणिवा आणि समकालीन जीवनानुभव यांचे विविध काव्यरूपांमधून दर्शन घडले. सूत्रसंचालन प्रा.मोहन बाबुळगावकर छत्रपती संभाजीनगर यांनी केले.



डॉ. अविनाश आगलगावकर यांची प्रकट मुलाखत घेतांना डॉ. कोमल ठाकरे

**चौथे सत्र – प्रकट मुलाखत**

रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूरचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. या प्रकट मुलाखतीत विद्यापीठाची शैक्षणिक वाटचाल, मराठी भाषा–साहित्याच्या संवर्धनासाठी विद्यापीठाची भूमिका तसेच भविष्यातील शैक्षणिक उपक्रम यांसह विविध विषयांवर संवाद साधण्यात आला. यावेळी त्यांनी कवितेवरील आपली असलेली नितांत ओढ आणि त्याबरोबरच संशोधनातील शिस्त आयुष्यभर कशी संभाळली याबद्दल ते व्यक्त झाले. महानुभाव संशोधनातील आपला प्रवास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

**सत्र पाचवे**

रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी झालेल्या परिसंवादात 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान' या विषयावर विचारमंथन झाले. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कोमल ठाकरे, अधिष्ठाता, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर हे होते.

या परिसंवादात डॉ. मिनाक्षी भोंदकर, अमरावती, प्रा. संदीप तडस, अमरावती आणि डॉ. कल्पना मेहरे, अमरावती यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन डॉ. उज्वला लोंढेकर यांनी केले.

या सत्रात महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि वैचारिक जडणघडणीत महानुभाव पंथाने दिलेले योगदान, मराठी भाषेच्या विकासातील भूमिका तसेच समतावादी आणि मानवतावादी विचारपरंपरेचा प्रभाव यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

विविध सत्रांमधील विचारमंथनामुळे महानुभाव साहित्य आणि विचारपरंपरेच्या वर्तमानकालीन संदर्भांवर तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीतील योगदानावर अभ्यासपूर्ण चर्चा घडून आली.

**सत्र सहावे–परिसंवाद**

महानुभाव दर्शनशास्त्र स्वरूप व वेगळेपण या विषयावर महंत अष्टूरकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यामध्ये महंत सारंगधर बाबा शास्त्री पूजदेकर यांनी षडदर्शने आणि इतर दर्शनाची ओळख करून महानुभाव दर्शनशास्त्राची वेगळीकता स्पष्ट केली. पु. नितीन दादा बांधकर यांनी जीव, देवता, प्रपंच परमेश्वर या चार पदार्थाचा विस्तार करत अविद्येविषयी आपली मते मांडली.महंत अष्टूरकर बाबा यांनी श्रीचक्रधर स्वामींच्या काळात झालेल्या विविध उघाण्या बद्दल सविस्तर चर्चा केली.

**समारोपिय सत्र**

महंत पाचराऊत बाबा यांच्या अध्यक्षतेखाली समारोपीय सत्र संपन्न झाले. यावेळी महंत परसराज बाबा कारंजेकर डॉ. अमोल ठाकरे डॉ. भैय्यासाहेब मेटकर तसेच अध्यासन प्रमुख महंत सोनपेठकर बाबा यांची उपस्थिती होते.आभार राजेश ठाकरे यांनी मानले


महंत सोनपेठकर बाबा यांचा सत्कार करतांना

# क्षणचित्रे


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
तिसरे महानुभाव साहित्य संमेलन


भारतीय महाविद्यालय, मोर्शी
तिसरे महानुभाव साहित्य संमेलन


महानुभाव साहित्य संमेलन




महानुभाव साहित्य संमेलन


भारतीय महाविद्यालय, मोर्शी
तिसरे महानुभाव साहित्य संमेलन


महानुभाव साहित्य संमेलन


भारतीय महाविद्यालय, मोर्शी
तिसरे महानुभाव साहित्य संमेलन

# क्षणचित्रे




भारतीय महाविद्यालय,मोर्शी


भारतीय महाविद्यालय,मोर्शी


भारतीय महाविद्यालय,मोर्शी




भारतीय महाविद्यालय,मोर्शी





# महानुभाव पंथ आणि 'लीळाचरित्र' हे मराठी साहित्यातील अमूल्य धन - डॉ. अण्णा वैद्य

## विद्यापीठात 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' विषयावर व्याख्यान संपन्न



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर



अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना
प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

श्री चक्रधर स्वामींचे जीवनचरित्र आणि 'लीळाचरित्र' अमूल्य ठेवा असून त्यात केवळ धार्मिकता नसून मानवी जीवनाला नैतिकतेची दिशा देणारा एक मोठा वैचारिक ठेवा आहे, असे प्रतिपादन सुप्रसिध्द वक्ते डॉ. अण्णा वैद्य यांनी केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, श्री सुभाष पावडे, अधिसभा सदस्य ॲड. अमोल ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक महंत डॉ. राजेंद्र सोनपेठकर, डॉ. संदीप जुनघरे उपस्थित होते.

व्याख्यानाची मांडणी करताना डॉ. वैद्य म्हणाले, लीळाचरित्र हा ग्रंथ कोणतीही कल्पित कथा नसून श्री चक्रधर स्वामींच्या आयुष्यात प्रत्यक्ष घडलेल्या घटनांवर आधारित आहे. म्हाइंभट्ट यांच्या लेखणीतून आणि नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हा ग्रंथ तयार झाला असून, मराठी भाषेच्या साहित्यात यासारखा दुसरा ग्रंथ नाही. या ग्रंथात राजेरजवाड्याच्या इतिहासाबरोबरच शेतकरी, गुराखी, सुतार, कुंभार आणि सामान्य लोकांच्या जीवनातील नोंदी व त्यांचे प्रश्न अत्यंत सूक्ष्मपणे मांडले गेले आहेत. महानुभाव पंथाचा विचार हा अत्यंत प्रेमळ, जिव्हाळ्याचा आणि नैतिकतेला धरून आहे. यात कोणत्याही प्रकारच्या बळजबरीला किंवा दांभिकतेला स्थान नाही. स्वामींनी आपल्या कृतीतून सर्वसामान्यांचे दुःख समजून घेतले आणि त्यांच्या व्यथा-वेदना दूर करण्याचा प्रयत्न केला.

पैठण येथून सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी सुरू केलेला ऐकेश्वरवादी, अद्वैती आणि 'ज्ञानमोचक' विचार समाजात नैतिक व सात्त्विक ज्ञान पसरवणारा ठरला आहे.

ते पुढे म्हणाले, मठ, मंदिरे आणि विविध संमेलनांच्या माध्यमातून हा विचार घराघरांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. हा विचार भारतीय ज्ञान प्रणालीचा एक महत्त्वाचा भाग बनला असून, या तत्त्वज्ञानाचा प्रसार विविध पातळ्यांवर होत आहे. महानुभाव पंथाचा हा विचार मानवी कल्याण साधणारा असून, प्रत्येकाने या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून आपल्या जीवनात त्याचा अंगीकार करावा, असा सूर या व्याख्यानातून व्यक्त करण्यात आला.



व्याख्यान देतांना सुप्रसिध्द वक्ते डॉ. अण्णा वैद्य

अध्यक्षीय भाषण करताना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, वक्त्यांनी 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व सुलभ विवेचन करून श्री चक्रधर स्वामींच्या जीवनकार्याचा आलेख मांडताना, त्यांनी सर्वसामान्यांच्या वेदना आणि यातनांचे निवारण करण्यासाठी केलेल्या अनंत लीलांचे प्रातिनिधिक स्वरूपात सुंदर चित्रण व्याख्यानातून मांडले आहे. सृष्टीच्या निर्मितीपासून ते अंतापर्यंतचे संपूर्ण तत्त्वज्ञान श्री चक्रधर स्वामींच्या कार्यामध्ये कसे सामावलेले आहे, हे अत्यंत सोप्या शब्दांत उपस्थितांसमोर ठेवले. अशा महान विचारांची देवाणघेवाण विविध व्यासपीठांवर व्हावी, आणि या कार्यात सर्वांनी आपला हातभार लावावा, अशी अपेक्षा अध्यक्षीय मनोगतात त्यांनी व्यक्त केली.विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सौ. संस्कृती काळे यांनी सुंदर रीतीने स्तवन सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ सीमाताई मेटकर, संचालन डॉ. संदीप जुनघरे, तर आभार महंत डॉ. राजेंद्र सोनपेठकर यांनी मानले. कार्यक्रमाला सौ. प्रतिभा भूगुल, सौ. शोभा देशमुख, सौ. रजनी घोरमाडे, श्री अनंत तेलखडे, श्री मनीष देशमुख, सौ. रजनीताई तायडे, श्री अशोक धाबे, श्री सतीश मानकर, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच गणमान्य नागरिक, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थिती

# महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढविणे काळाची गरज - महंत पाचराऊत बाबा ..
# तिस-या महानुभाव साहित्य संमेलनाचा समारोप



साहित्य संमेलन समारोप कार्यक्रमप्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर

माणसाला भेडसावणा–या प्रत्येक समस्येचे समाधान महानुभाव साहित्यात आपल्याला दिसून येते. अशा या महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन तिस–या महानुभाव साहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महंत पाचराऊत बाबा यांनी केले.

समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. भैय्यासाहेब मेटकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य अॅड. अमोल ठाकरे, मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे, अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर बाबा, डॉ. अण्णा वैद्य, प्राचार्य डॉ. संतोष आगरकर, परसराज कारंजेकर आदी मान्यवर उपस्थित होते. दोन दिवस भरगच्च चाललेल्या कार्यक्रमाचे कौतुक केले. महानुभाव अध्यासनाच्या कार्याची व्याप्ती त्यांनी विषद केली.

या दोन दिवसीय संमेलनात सकाळी डॉ. अविनाश आवलगावकर, कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ यांची डॉ. कोमल ठाकरे, अधिष्ठाता यांनी प्रकट मुलाखत घेतली. चौथ्या सत्रात महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान या दुस–या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. कोमल ठाकरे यांनी भूषविले. यावेळी डॉ. मिनाक्षी भांदककर, प्रा. संदीप तडस, डॉ. कल्पना मेहरे यांनी पंथाचे आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक योगदान याविषयी शिल्प गुंफले. तर पाचव्या सत्रात महानुभाव दर्शनशास्त्र : स्वरूप व वैशिष्ट्ये या तिस–या परिसंवादाचे अध्यक्षस्थान आचार्य महंत अष्ठुरकर बाबा यांनी भूषविले. या परिसंवादात महंत श्री सारंगधरबाबा शास्त्री पुसदेकर, श्री नितीनदादा बांधकर यांनी विचार व्यक्त केले.

समारोपीय कार्यक्रमात अॅड. अमोल ठाकरे यांनी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान ख–या अर्थाने तरुणांपर्यंत पोहोचण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. डॉ. रवींद्र कडू यांनी मराठी भाषा समृध्द करण्यात महानुभाव साहित्याचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद केले. याप्रसंगी साहित्य संमेलनाच्या दोन दिवसीय यशस्वी आयोजनाबद्दल सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अष्ठशताब्दी महोत्सव समितीचे प्रमुख राजेश ठाकरे व सर्व सहका–यांचा प्रमाणपत्र देऊन महानुभाव अध्यासन केंद्राच्यावतीने सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी, तर समारोपीय प्रास्ताविक महंत सोनपेठकर बाबा यांनी केले. संमेलनात महानुभाव साहित्य चित्र प्रदर्शनीचे मान्यवरांनी व साहित्यिकांनी अवलोकन केले. कार्यक्रमासाठी भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती, मोर्शी व साहित्यिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विद्यापीठामध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप

## प्रशिक्षणासोबत युवकांमध्ये सामाजिक दायित्वाची इच्छाशक्ती असणे गरजेचे - कुलसचिव डॉ. अविनाश असनारे




समारोपीय सोहळा प्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर

युवकांना आपत्तीच्या काळात प्रभावीपणे मदत करता यावी, तसेच त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी आणि दायित्वाची भावना विकसित व्हावी, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दोन दिवसीय 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेच्या समारोप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रमुख अतिथी म्हणून एन.डी.आर.एफ., महाराष्ट्र राज्याचे श्री. ब्रिजेश यादव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व रोसेयो संचालक डॉ. निलेश कडू आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणातून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, केवळ प्रशिक्षण घेणे पुरेसे नाही, तर प्रशिक्षणासोबत युवकांमध्ये सामाजिक दायित्वाची इच्छाशक्ती असणे गरजेचे आहे. आपत्तीच्या प्रसंगी समाजासाठी तत्परतेने काम करण्याची मानसिकता स्वयंसेवकांनी विकसित करावी, असे आवाहन सुद्धा त्यांनी याप्रसंगी केले.

मार्गदर्शन करतांना डॉ. विद्या शर्मा म्हणाल्या तरुणांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन स्वतःच्या आणि समाजाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी तसेच आपत्तीच्या वेळी मिळालेले प्रशिक्षण उपयोगी आणावे आणि समाज जागृती करावी, असा संदेश दिला.

दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे विविध धडे गिरवण्यात आले. त्यामध्ये एन.डी.आर.एफ. मार्फत विविध आपत्तीमध्ये बचाव कार्याचे प्रशिक्षणामध्ये आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, आपत्ती काळात काय करावे व काय करू नये, डिझास्टर मॅनेजमेंट किट बद्दल माहिती, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, सी.पी.आर., एफ.बी.ए.ओ., ब्लीडिंग कंट्रोल, एफ.डब्ल्यू.आर., इम्प्रोवाईज्ड फ्लोटिंग डिव्हाईसेस तसेच पूर परिस्थितीत बचावाचे कार्य, बॉडी असेसमेंट, सर्पदंश, दोरीच्या गाठी, आगीचे व्यवस्थापन व अग्निशामन यंत्राचे वापर आदींवर प्रात्यक्षिकांसह श्री. ब्रिजेश यादव आणि त्यांच्या संपूर्ण चमूने मार्गदर्शन केले.




अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व मंचावर उपस्थित मान्यवर

या कार्यशाळेला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय नागरे व अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांनी सदिच्छा भेट दिली. संचालन यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निलीमा दवणे यांनी, तर आभार अमरावती जिल्हा समन्वयक डॉ. विशाल गजभिये यांनी मानले. दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेविषयी रासेयो विद्यार्थी दिपाली सोनटक्के व पियुष वानखेडे तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. राखी इंगळे यांनी कार्यशाळेविषयी अभिप्राय दिला. आपत्ती व्यवस्थापनासोबतच सामाजिक जाणीव, स्वयंसेवी वृत्ती आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांसाठी उपयुक्त ठरली. या कार्यशाळेमध्ये पाचही जिल्ह्यांच्या महाविद्यालयांतील १९५ रासेयो कार्यक्रम अधिकारी व २१८ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सांगता प्रा. अरविंद तट्टे यांनी राष्ट्रवंदना गाऊन केली.



समारोपीय कार्यक्रमाला उपस्थिती



# विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवड चाचणी शिबीराचे उद्घाटन संपन्न

## रासेयो स्वयंसेवकांनी विद्यापीठाचा नावलौकीक उंचवावा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

विद्यापीठाच्या रासेयो स्वयंसेवकांनी राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करुन विद्यापीठाच्या नावलौकीकात भर घातली असून निवड झालेल्या रासेयो स्वयंसेवकांनी यापुढेही असाच नावलौकीक मिळवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबीराचे उद्घाटन संपन्न झाले. त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. उद्घाटक म्हणून एनसीसी मुख्यालय, अमरावती येथील ८ महाराष्ट्र बटालियनचे ए.ओ. लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, अमरावती शहर रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. विशाल गजभिये, ग्रामीण समन्वयक डॉ. विकास देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निलिमा दवणे, वाशिम जिल्हा समन्वयक डॉ. अशोक वाघ, लेफ्टनंट प्रा. ऋषभ डहाके, कमांडन्ट डॉ. नितीन बनसोड आदी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, १७७ गुणवंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय फेरीत स्थान मिळिवले आहे. यशाची पहिली पायरी विद्यार्थ्यांनी ओलांडली आहे. मागील वर्षी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत स्वयंसेवकांनी अनेक पारितोषिके जिंकली होती. आव्हान स्पर्धेचे विद्यापीठातील आयोजन लक्षवेधी ठरले. इतर विद्यापीठांच्या कुलगुरूंनी सुध्दा याचे कौतुक केले होते.




उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा



दीपप्रज्वलन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगे बाबांचे नांव असलेल्या या विद्यापीठाचे प्रतिनिधत्व करतांना सहभागी स्वयंसेवक सदैव शिस्त, उच्च मूल्य आणि जबाबदारीची जाणीव ठेवतील असे सांगून निवड चाचणीच्या निमित्ताने सर्व विद्यार्थी, प्रशिक्षक व मार्गदर्शक आपल्या क्षमतेची पूर्ण ताकद पणाला लावतील आणि विद्यापीठाचे नांव आणखी उज्ज्वल करतील, असा आशावाद कुलगुरूंनी व्यक्त केला.

सर्वप्रथम प्रमुख अतिथी लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, विद्यार्थ्यांची मेहनत व महाविद्यालयातील शिक्षकांनी घेतलेले परिश्रम आणि मार्गदर्शन यामुळेच विद्यार्थ्यांची या शिबिरामध्ये निवड झाली आहे. या शिबिरातून ज्या विद्यार्थ्यांची निवड होईल ते विद्यार्थी राज्य व राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालये व विद्यापीठाचे नाव उंचावतील असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दीपप्रज्वलन आणि कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकतेतून राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांनी विशेष शिबिर चाचणी आयोजनामागील भूमिका विषद केली. संचालन डॉ. निलिमा दवणे यांनी, तर आभार डॉ. विशाल गजभिये यांनी मानले. कार्यक्रमाला पाचही जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय समन्वयक, कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व विद्यार्थीनी

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाल्यानेच शिक्षणाचा उद्देश साध्य होईल - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते ..

## अमरावती विद्यापीठात दीक्षारंभ २०२६ कार्यक्रम उत्साहात संपन्न




अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन त्यांनी देशाचे एक सक्षम आणि जबाबदार नागरिक व्हावे, तरच खया अर्थाने शिक्षणाचा उद्देश साध्य होईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश समितीच्यावतीने 'दीक्षारंभ २०२६' नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रमुख अतिथी म्हणून रिलायन्स फाउंडेशनच्या सीएसआर समन्वयक पायल भैसारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, आंतर विद्याशाखीय अभ्यास शाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. कपिल कांबळे आदी उपस्थित होते.

कुलगुरू पुढे म्हणाले, शिक्षणाचा मूळ उद्देश हा केवळ परीक्षा पास होणे किंवा पदवी मिळवणे नसून, त्यापलीकडे जाऊन एक चांगला माणूस व जबाबदार नागरिक तयार करणे आहे. आजच्या गतिमान जगात प्रत्येक क्षेत्रात टिकून राहण्यासाठी स्वत:मध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे आणि लवचिकता निर्माण करणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कौशल्याधारित शिक्षण आणि इंटर्नशिप मिळण्यावर भर दिला जात आहे, त्यामुळे उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील दरी कमी होऊन रोजगार निर्मितीला चालना मिळेल. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ या विचारांना पुढे नेण्याचे आणि विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असल्याचेही त्यांनी याप्रसंगी सांगितले.

प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करुन विकसित भारत २०४७ चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तरुणांचा सहभाग महत्वाचा असल्याचे सांगितले. तसेच आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहा, असे आवाहनही त्यांनी केले. मनोगत व्यक्त करताना कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, विद्यार्थ्यांना शिक्षणातून मिळणारे ज्ञान आणि कौशल्ये हेच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे केवळ एक औपचारिकता म्हणून न बघता, त्यामागील गांभीर्य समजून घेणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी पायल भैसारे यांनी रिलायन्स फाउंडेशनच्यावतीने दिल्या जाणाया पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिष्यवृत्तीबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यापीठातील विविध विभागप्रमुखांनी यावेळी विभागाची माहिती दिली.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक भाषणातून विद्यापीठ केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. कपिल कांबळे यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. प्रणव कोलते यांनी, तर आभार डॉ. कमलाकर मोरे यांनी मानले. दीक्षारंभ कार्यक्रमाला विद्यापीठातील विभागप्रमुख, शिक्षक, कर्मचारी व नवीन प्रवेशित विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थिती

# विद्यापीठाची कवी केशवसुत काव्यस्पर्धा उत्साहात संपन्न ..
# उर्वी खडके प्रथम, आत्मजा मोरे द्वितीय तर प्रणव कोरे तृतीय



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर, विद्यार्थी व विद्यार्थीनी

सामाजिक वास्तव, मानवी वेदना, परिवर्तनाची आस आणि समकालीन प्रश्नांचे आत्मभान व्यक्त करणाऱ्या प्रभावी काव्यसादरीकरणामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागातर्फे आयोजित 'कवी केशवसुत काव्यस्पर्धे'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विश्वबंधुत्व दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात आयोजित या स्पर्धेत तरुण कवींनी विविध विषयांवरील कविता सादर करून रसिकांची दाद मिळिवली. टाळ्यांचा कडकडाट, उत्स्फूर्त प्रतिसाद आणि तरुणाईच्या उत्साहामुळे सभागृह दिवसभर काव्यमय झाले होते.

स्पर्धेत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथील उर्वी हेमंत खडके हिने प्रथम क्रमांक पटकावला. श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला येथील आत्मजा सुरेश मोरे हिने द्वितीय, तर हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथील प्रणव कोरे याने तृतीय क्रमांक मिळिवला. विजेत्यांना अनुक्रमे रु.३०००, रु.२००० आणि रु.१५०० रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालये व शैक्षणिक विभागांतील ३३ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. स्पर्धेचे हे नववे वर्ष होते.

या स्पर्धेतील कवितांमधून मानवी नातेसंबंध, वैयक्तिक अनुभव, सामाजिक विषमता, मानवी सुखदुःख, स्त्रीजीवन, पर्यावरण, बदलती जीवनमूल्ये आणि समकालीन सामाजिक प्रश्नांना सर्जनशील अभिव्यक्ती प्राप्त झाली.आशयातील वैविध्य, भाषेचा नेमका वापर, काव्यात्मता, कल्पनाशक्ती आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली.

अध्यक्षीय भाषणात मराठी विभागप्रमुख तथा मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांनी कविता ही माणसाच्या अंतःकरणाला शब्दरूप देणारी सर्जनशील भाषा असल्याचे सांगितले. मराठी कवितेची समृद्ध परंपरा, आशयवैविध्य आणि अभिव्यक्तीचे विविध आकृतिबंध विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यापक अवकाश देतात. विद्यार्थ्यांना या परंपरेचा परिचय व्हावा, कवितेविषयी आस्था निर्माण व्हावी आणि त्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काव्यवाचन व काव्यलेखनामुळे भाषिक जाणिवा, संवेदनशीलता आणि चिकित्सक दृष्टी विकसित होते, असेही त्यांनी नमूद केले.

उद्घाटनप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कविता ही मानवी अनुभव, भावना आणि विचारांना कलात्मक अभिव्यक्ती देणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. अनुभवाला शब्दरूप मिळाल्याने त्याला व्यापक अर्थ प्राप्त होतो आणि सभोवतालच्या जगाशी संवेदनशील संवाद साधता येतो. विद्यार्थ्यांनी अशा सर्जनशील उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपल्या अभिव्यक्तीला आकार द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कुलसचिव, डॉ. अविनाश असनारे

परीक्षक तथा श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे यांनी विचार आणि भावना यांच्या सुंदर मिलाफातून कवितेला काव्यात्मक सौंदर्य प्राप्त होते, असे सांगितले. आशय–अभिव्यक्तीचा समतोल, भाषेचा नेमका वापर, प्रतिमा, लय, भावविश्व आणि सादरीकरण हे कवितेचे महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रसिद्ध कवी व गझलकार तथा परीक्षक अनंत नांदुरकर यांनी काव्यनिर्मिती ही संवेदनशीलतेची साधना असल्याचे सांगितले. तरुणांच्या कवितेत वैयक्तिक भावविश्वासोबत सामाजिक वास्तवाचे भान आणि मानवी वेदनांविषयीची संवेदनशीलता प्रभावीपणे व्यक्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे आणि अनंत नांदुरकर यांनी आशय, भाषिक सौंदर्य, काव्यात्मता, कल्पनाशक्ती, भावनिक प्रभाव, सादरीकरण आणि सामाजिक आशय या निकषांच्या आधारे कवितांचे परीक्षण केले.

दिवसभर रंगलेल्या या काव्यमैफलीचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. डॉ. हेमंत खडके यांनी केले. त्यांच्या उत्साही आणि ओघवत्या निवेदनामुळे स्पर्धेतील प्रत्येक टप्पा अधिक रंगतदार झाला.

उद्घाटन सत्र व बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. अभिजित इंगळे यांनी केले. उद्घाटन सत्राचे आभार प्रा. अंकिता जैन, तर बक्षीस वितरण सत्राचे आभार स्पर्धेचे समन्वयक प्रा.डॉ. प्रणव कोलते यांनी मानले. स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रा.डॉ. मोना चिमोटे, प्रा.डॉ. माधव पुटवाड, प्रा. डॉ. प्रणव कोलते तसेच पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी सक्रिय परिश्रम घेतले



विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करतांना मान्यवर

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सी.एम.डी.आर. ला विदेशी शिष्टमंडळाची भेट

## कोरोना काळातील उत्कृष्ट कार्याचा गौरव



विदेशी शिष्टमंडळ, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार,सी.एम.डी.आर. चे संचालक डॉ. प्रशांत ठाकरे आणि उपसंचालक डॉ. नीरज घनवटे व विद्यार्थी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस अँड रिसर्च (सी.एम.डी.आर.) ला विदेशी संशोधन तज्ज्ञ आणि आरोग्यशास्त्रज्ञांच्या एका प्रतिष्ठित शिष्टमंडळाने सदिच्छा भेट दिली. या शिष्टमंडळामध्ये मिस एस्टर गेरेन्डास (नर्सिंग स्पेशालिस्ट, बोस्टन), ग्रेस मे (एमडी ट्यूटर), जॅस्मिन सुंग (सिल्व्हर स्प्रिंग एमडी) आणि मेरी प्रभूदास (सिल्व्हर स्प्रिंग एमडी) यांचा समावेश होता. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार, डॉ. के.सी. मोरे, सी.एम.डी.आर. चे संचालक डॉ. प्रशांत ठाकरे आणि उपसंचालक डॉ. नीरज घनवटे उपस्थित होते.

**अत्याधुनिक सुविधांची पाहणी व उच्चस्तरीय चर्चा**

दौयादरम्यान पाहुण्यांनी विद्यापीठाच्या अत्याधुनिक सुविधांची पाहणी करुन प्राध्यापक व संशोधकांशी संवाद साधला. यावेळी संचालक डॉ. प्रशांत ठाकरे यांनी सी.एम.डी.आर. केंद्राच्यावतीने सुरु असलेल्या प्रकल्पांची यावेळी माहिती दिली. तसेच कोरोना महामारीच्या काळात प्रयोगशाळेने समाजाला सेवा देवून कशी मोलाची कामगिरी बजावली, याचे सादरीकरण केले.

**कोरोना काळातील योगदानाचे भरभरुन कौतुक**

भेटीदरम्यान शिष्टमंडळाने कोविड – १९ साथीच्या उच्चांकाच्या काळात विद्यापीठाने बजावलेल्या धाडसी आणि निर्णायक आघाडीच्या भूमिकेबद्दल गौरवोद्गार काढून सार्वजनिक आरोग्य यंत्रणेवर अभूतपूर्व ताण असताना, विद्यापीठातील सी.एम.डी.आर. केंद्राने प्रादेशिक नागरिकांसाठी आणलेली आण्विक निदान चाचणी यंत्रणा अत्यंत प्रभावी ठरल्याचे याप्रसंगी नमूद केले. तसेच संकट काळातील तत्परता, तांत्रिक अचूकता आणि समुदाय–केंद्रित प्रयत्न हे प्रादेशिक रोग व्यवस्थापनासाठी एक उत्तम आणि दिशादर्शक मॉडेल असल्याचे सांगून चोवीस तास चालणाया चाचणी प्रक्रिया आणि कडक गुणवत्ता नियंत्रण प्रणालीची त्यांनी विशेष प्रशंसा केली.

**भविष्यातील आंतरराष्ट्रीय सहकार्याला बळ**

भेटीदरम्यान संशोधन अभ्यासक मिस पूजा मांडविया, मिस रेणुका येंदे आणि विद्यार्थ्यांनीही विदेशी तज्ज्ञांशी संवाद साधला. दौयादरम्यान भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त संशोधन आणि सहकार्य वाढवण्यावर भर देण्याचे ठरले. स्थानिक पातळीवरील साथीच्या रोगांच्या व्यवस्थापनातील अनुभवांचा फायदा जागतिक स्तरावर वैज्ञानिक संशोधनासाठी कसा घेता येईल, यावर विद्यापीठ अधिकायांनी आशावाद व्यक्त केला.

# विदेशी संशोधकांची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाला भेट




विदेशी संशोधक प्रसार माध्यम एक्सपर्ट जस्मिन सुंग (जर्मनी), मेडिकल एक्सपर्ट ग्रेस एम (युएसए), स्त्री अभ्यास एक्सपर्ट इस्थरजी (बोस्टन अमेरिका) व वैज्ञानिक मर्षी प्रभुदास (सिंगापूर) समवेत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग प्रमुख व शिक्षक

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाला विदेशी संशोधकांनी भेट देऊन विभागातील संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधला. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार व डॉ.के.सी. मोरे उपस्थित होते. याप्रसंगी विदेशी संशोधक प्रसार माध्यम एक्सपर्ट जस्मिन सुंग (जर्मनी), मेडिकल एक्सपर्ट ग्रेस एम (युएसए), स्त्री अभ्यास एक्सपर्ट इस्थरजी (बोस्टन अमेरिका) व वैज्ञानिक मर्षी प्रभुदास (सिंगापूर) यांनी विविध सामाजिक, आर्थिक आणि ग्रामीण प्रश्नांवर समाजशास्त्र विभागातील सर्व संशोधक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली. या भेटीदरम्यान विदेशी संशोधक एक्सपर्ट यांनी संशोधक विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांच्या संशोधनाविषयी माहिती जाणून घेतली.

यावेळी आदिवासी कुटुंबाच्या समस्यां, शेतकऱ्यांची ग्रामीण व नागरी भागातील सामाजिक आणि आर्थिक समस्यां तसेच भारतीय समाजावर पडलेला आय.सी.टी व सोशल मीडियाचा प्रभाव आदी विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. या संवादामुळे समाजशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना नवीन संशोधन दृष्किोन मिळाला. विविध सामाजिक प्रश्नांवर संशोधनाच्या माध्यमातून उपाय शोधण्यासाठी अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संशोधकांच्या संवादाचे अधिक महत्त्व असून या भेटीमुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या संशोधन कार्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवीन दिशा मिळण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, अतिथींचा परिचर डॉ. वर्षा नाठार, सूत्रसंचालन प्रा.डॉ. रोहिणी देशमुख यांनी, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. या भेटीदरम्यान विभागातील शिक्षक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'डॉकिंग वर्कबेंच' वेब अप्लिकेशनचे कुलगरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते थाटात लोकार्पण

## संगणकीय रसायनशास्त्रासाठी विद्यार्थ्याच्या संशोधन कौशल्यातून साकारले नवे व्यासपीठ



'डॉकिंग वर्कबेंच' या वेब अप्लिकेशनचे लोकार्पण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर

शिक्षक दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात विकसित करण्यात आलेल्या 'डॉकिंग वर्कबेंच' या वेब अप्लिकेशनचे लोकार्पण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते त्यांच्या दालनात करण्यात आले. लोकार्पणप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश आसनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.आर.डी. सिकची, प्राचार्य डॉ. विजय नागरे, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर व सहाय्यक कुलसचिव श्री रविंद्र सयाम उपस्थित होते.

रसायनशास्त्र क्षेत्रातील विद्यार्थी व संशोधकांना अधिक सुलभ, गतिमान व परिणामकारक संशोधन करता यावे, या उद्देशाने हे वेब अप्लिकेशनचे व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे. हे नाविन्यपूर्ण वेब अप्लिकेशन रसायनशास्त्र विभागातील एम.एस्सी.चा विद्यार्थी वैभव पवार याने विभागातील शिक्षक डॉ. मनिषा कोडापे यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित केले आहे. विषयज्ञान आणि संगणकीय कौशल्यांची सांगड घालत वैभव पवार या विद्यार्थ्याने संशोधनासाठी उपयुक्त ठरणारे हे डिजिटल व्यासपीठ साकारले आहे.

'डॉकिंग वर्कबेंच' हे आण्विक डॉकिंग प्रक्रियेतील विविध टप्पे सुलभ करणारे वेब-आधारित संशोधन आहे. याद्वारे विद्यार्थी व संशोधकांना आण्विक डॉकिंग, त्याचे विश्लेषण आणि संबंधित संगणकीय संशोधन प्रक्रियेचे नियोजन व अंमलबजावणी अधिक सहजपणे करता येणार आहे. तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून संशोधनातील वेळ व श्रमाची बचत करण्याच्या दृष्टीने हे अप्लिकेशन महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

लोकार्पणानंतर रसायनशास्त्र विभागात 'डॉकिंग वर्कबेंच' चे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे यांना यावेळी अप्लिकेशनची कार्यपद्धती, वैशिष्ट्ये आणि संशोधनातील संभाव्य उपयोग याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. याप्रसंगी डॉ.आर.डी. सातपुते, डॉ.ए.एस. वानखडे व प्रा. गजानन आमले उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना, तांत्रिक कौशल्ये आणि संशोधनाभिमुख उपक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या विद्यापीठाच्या धोरणाला 'डॉकिंग वर्कबेंच' मुळे नवी चालना मिळेल, तसेच मॉलीक्युलर डॉकिंग व संगणकीय रसायनशास्त्राच्या क्षेत्रात कार्यरत विद्यार्थी, संशोधक आणि अध्यापकांसाठी हे व्यासपीठ भविष्यात मोलाचे ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# गृहविज्ञान विभागात 'राष्ट्रीय पोषण माह २०२६' चे थाटात उद्घाटन

## 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' या संकल्पनेतून पोषण जनजागृतीचा संदेश



गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, प्रमुख अतिथी पुष्पा चिखलकर, इतर मान्यवर व विद्यार्थीनी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागात नुकतेच राष्ट्रीय पोषण माह २०२६ चे उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटक म्हणून गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, तर प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त अंगणवाडी पर्यवेक्षिका पुष्पा चिखलकर उपस्थित होत्या. यावर्षीच्या राष्ट्रीय पोषण माहची 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' ही मुख्य संकल्पना असून, आहारातील विविधता, प्रथिनांचे योग्य प्रमाण, ताजे व गरम शिजवलेला आहार, सामुदायिक जबाबदारी, बालविकासासाठी पोषण, पोषणविषयी व आहाराविषयी शासकीय योजना या सहसंकल्पनेच्या माध्यमातून अंगणवाडीचे महत्त्व, बालकांचे पोषण, माता व बालकांचे आरोग्य आणि समाजातील सर्व घटकांबाबत पोषणविषयक जबाबदारी याबाबत जनजागृती करण्याचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी त्या म्हणाल्या, राष्ट्रीय पोषण माह च्या व्यापक संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना अंगणवाडीच्या कार्यात केवळ अंगणवाडी सेविकांचीच नव्हे, तर पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि संपूर्ण समाजाची जबाबदारी असते. बालकांच्या पोषणाची योग्य काळजी घेणे, संतुलित आहाराबाबत जनजागृती करणे, माता व बालकांच्या आरोग्याकडे लक्ष देणे तसेच पोषणविषयक योग्य सवयी समाजात रुजविण्याची गरज असून सुदृढ बालक म्हणजे सुदृढ कुटुंब आणि सुदृढ समाजाचा पाया असल्याचेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी त्यांनी राष्ट्रीय पोषण माहची संकल्पना आणि त्यामागील उद्देश याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

निवृत्त अंगणवाडी पर्यवेक्षिका पुष्पा चिखलकर यांनी राष्ट्रीय पोषण माह च्या निमित्ताने गृहविज्ञान विभागात Nutritional Schemes Run Under ICDS या विषयांतर्गत बालकांसाठी दिल्या जाणा–या पूरक आहाराचे महत्व व फायदे, तसेच शासनामार्फत बालक, गर्भवती महिला व स्तनदा मातांसाठी राबविण्यात येणाया विविध पोषण योजना व कार्यक्रम तसेच स्तनदा मातांना मिळणारा भत्ता व आर्थिक मदत आदींची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन त्यांनी केले.

राष्ट्रीय पोषण माहच्या उद्घाटनासाठी गृहविज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा वापर करून आकर्षक व संदेशपर उद्घाटन बोर्ड तयार केला. या बोर्डवर राष्ट्रीय पोषण माहची थीम तसेच पोषण आणि अंगणवाडीच्या महत्त्वाशी संबंधित संदेश प्रभावीपणे मांडण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेतून साकारलेला हा बोर्ड कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला. तसेच 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' या थीमला अनुसरून विद्यार्थ्यांनी विभागाच्या परिसरात सुंदर आणि आकर्षक रांगोळी काढली. रांगोळीच्या माध्यमातून अंगणवाडी, बालपोषण, आरोग्य आणि पोषण यांचा संदेश कलात्मक पद्धतीने सादर करण्यात आला.

कार्यक्रमाला विभागातील शिक्षक सुमित गेडाम, रविशा आंबेकर, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, विशाखा खांडेकर, अनुश्री आडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी अशोक हिरे, वसंत इंगळे, चरणदास जामठे व विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# परतवाडा येथील स्व. छगनलाल कढी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची स्कुल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाला शैक्षणिक भेट




नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० च्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातील बदल, विद्यापीठातील शैक्षणिक सुविधा, प्रयोगशाळा आणि संशोधनाच्या संधींची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या 'स्कुल कनेक्ट' उपक्रमांतर्गत स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला, विज्ञान महाविद्यालय, अचलपूर कॅम्प (परतवाडा) येथील विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाला शैक्षणिक भेट दिली.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन परिपत्रकानुसार 'स्कुल कनेक्ट' उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामधील विद्यार्थी केंद्रित बदल, बहुविद्याशाखीय व लवचिक अभ्यासक्रम, कौशल्याधारित शिक्षण, शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणातील विविध संधींची माहिती करून देणे हा आहे. या उपक्रमांतर्गत 'कॅम्पस टूर' आयोजित करून विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा, अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध उपक्रमांची प्रत्यक्ष माहिती देण्याचे निर्देश आहेत. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. ए. वाघुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील डॉ. जी. जी. मुळे, प्रा. विजय लोडे, प्रा. गौरव सातव, प्रा. वैदेही बोंबटकर, प्रा. राज पारखी यांनी विविध प्रयोगशाळा, आधुनिक वैज्ञानिक उपकरणे, त्यांची कार्यपध्दती आणि संशोधनाच्या विविध क्षेत्रांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी महाविद्यालयाच्या प्रा. मृणाल पैठणकर, प्रा. प्रिया झोडपे, प्रा. सानिया तट्टे, प्रा. प्रणाली तायडे उपस्थित होत्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र विभागातील विविध प्रयोगशाळांना भेट देऊन आधुनिक उपकरणे, त्यांचा उपयोग, कार्यपध्दती, विविध प्रयोगांमागील वैज्ञानिक संकल्पना याबाबत विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने माहिती जाणून घेतली. तसेच प्राध्यापकांशी संवाद साधत आपल्या शंकांचे निरसन केले. प्रयोगशाळा आधारित शिक्षण, आधुनिक वैज्ञानिक उपकरणांचा वापर, संशोधनाच्या संधी, उच्च शिक्षणातील भौतिकशास्त्राचे महत्त्व आदींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष प्रयोगशाळा भेटीमुळे वर्गात शिकलेल्या सैध्दांतिक संकल्पना आणि त्यांचा प्रत्यक्ष प्रयोगांशी असलेला संबंध समजण्यास विद्यार्थ्यांना मदत झाली.

'स्कुल कनेक्ट' हा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या वातावरणाशी जोडणारा उपक्रम असून, त्यामधून विद्यापीठातील अभ्यासक्रम, पायाभूत सुविधा, शिष्यवृत्ती आणि सर्वांगीण विकासाच्या विविध संधींची माहिती मिळते. या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रयोगशीलता आणि भौतिकशास्त्र विषयाबद्दलची जिज्ञासा वाढण्यास मदत झाली.

# कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेत सेवानिवृत्ती सत्कार सोहळा संपन्न

## डॉ. राजेश सिंह व डॉ. देवेंद्र जोशी यांच्या ३५ वर्षांच्या सेवेचा गौरव


व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

विद्यापीठातील सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व विभागप्रमुखांच्या सहकार्यामुळे आणि सांघिक भावनेमुळे आज विद्यापीठ वित्तीय तूट मधून बाहेर पडून सरप्लस स्थितीत पोहोचले असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. तब्बल ३५ वर्षे निष्ठापूर्वक सेवा बजावून निवृत्त होत असलेले डॉ. राजेश सिंग आणि डॉ. देवेंद्र जोशी यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचा व योगदानाचा सत्कार करण्यात आला. अशा अनुभवी व्यक्तींच्या निवृत्तीमुळे होणारी पोकळी भरून काढण्यास वेळ लागतो, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

सेवानिवृत्त दोन्ही अधिका–यांना आणि त्यांच्या कुटुंबाला पुढील आयुष्य सुख, समाधान आणि उत्तम आरोग्याचे लाभो, अशी प्रार्थना करत कुलगुरूंनी त्यांना भावपूर्ण निरोप व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सत्कारमूर्ती डॉ. राजेश सिंह, डॉ. प्रिती सिंह, श्री. देवेंद्र जोशी, सौ. जोशी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी दोन्ही सत्कारमूर्तींचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर डॉ. प्रिती सिंह यांचा उपकुलसचिव सौ. मोनाली तोटे पाटील, सौ. जोशी यांचा उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी साडी–चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. हेमंत देशमुख म्हणाले, खरे तर आपल्या कामाचं मूल्यमापन समाज करीत असतो. दोन्ही सत्कारमूर्तींचे सेवाकाळातील कार्य अतिशय चांगले आहे आणि कर्मचारी समर्पण भावनेने काम करीत असल्यामुळे विद्यापीठाची प्रतिमा देखील उंचावत आहे. त्याचबरोबर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे योग्य नियोजन आणि पारदर्शकतेमुळे विद्यापीठाने क्यूएस रँकिंगमध्ये जगात नावलौकीक मिळिवला आहे व याचे श्रेय कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांना द्यावे लागेल, असे सांगून त्यांनी दोन्ही सत्कारमूर्तींना पुढील भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी आपल्या मनोगतातून तीनही सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सत्कारमूर्ती डॉ. राजेश सिंह व श्री. देवेंद्र जोशी यांनी आपल्या मनोगतातून सेवाकाळात सहका–यांकडून मिळालेला प्रेम, आदरभाव याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करुन याप्रसंगी त्यांनी सेवाकाळात केलेल्या कार्याची माहिती दिली.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार प्रभारी सहा. कुलसचिव डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.


अध्यक्षीय भाषण करतांना
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख मार्गदर्शन करतांना



डॉ. राजेश सिंह यांचा सेवानिवृत्ती प्रसंगी सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते इतर मान्यवर



श्री देवेंद्र जोशी यांचा सेवानिवृत्ती प्रसंगी सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते इतर मान्यवर

# विद्यापीठात ‘इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड’

## पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन



‘इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड पुस्तकाचे प्रकाशन करतांना मान्यवर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र पदव्युत्तर विभागात बी.एस्सी. भूगर्भशास्त्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाया ‘इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड : अ ग्रॅज्युएट लेव्हल अप्रोच’ या नवीन पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला. ‘ज्ञानपथ’ प्रकाशनाद्वारे हे पुस्तक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सिपना कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचे प्राचार्य तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी प्र–कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, प्रमुख अतिथी म्हणून भारतीय महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक व विभागप्रमुख तथा भारतीय विद्या मंदिर, अमरावतीचे उपाध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी, विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. यादवकुमार मावळे व्यासपीठावर उपस्थित होते.

भारतीय स्तरविज्ञानाचा अभ्यास करणाया विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक सोप्या, सुसंगत आणि पदवी स्तराला अनुरूप स्वरूपात तयार करण्यात आले आहे. भारतीय उपखंडातील विविध भूवैज्ञानिक स्तररचना, त्यांचा कालानुक्रमिक विकास आणि संबंधित भूवैज्ञानिक संकल्पना समजून घेण्यासाठी हा ग्रंथ विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार आहे. बी.एस्सी. जिऑलॉजीच्या विद्यार्थ्यांसोबतच भूगर्भशास्त्राच्या उच्च शिक्षणासाठी आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठीही हे पुस्तक महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे संपादन डॉ. सतीश कुलकर्णी आणि डॉ. यादवकुमार मावळे यांनी केले आहे. पुस्तकाच्या लेखनात प्रादेशिक स्तरावरील अनुभवी व नामवंत भूगर्भशास्त्र प्राध्यापकांचा सहभाग असून त्यामध्ये डॉ.एस.के. पौनिकर (सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र व जिओइन्फॉरमॅटिक्स विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती), डॉ.एस.एस. देशमुख (विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र विभाग, गुलाम नबी आझाद कॉलेज, बार्शीटाकळी), प्रा.पी.एम. गिरी (सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र व जिओइन्फॉरमॅटिक्स विभाग, श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स, अकोला), डॉ.पी.एस. परिमल (सहयोगी प्राध्यापक, भूगर्भशास्त्र विभाग, जी.एस. टोम्पे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार), डॉ.एम.एम. देशमुख (विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र व जिओइन्फॉरमॅटिक्स विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती) आणि डॉ.एस.आर. वरघट (विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र विभाग, भारतीय महाविद्यालय, अमरावती) यांचा समावेश आहे.

विद्यापीठ तसेच परिसरातील संलग्नित महाविद्यालयांच्या भूगर्भशास्त्र विभागातील प्राध्यापकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या प्रकाशन सोहळ्यामुळे अमरावतीच्या शैक्षणिक वतुर्ळात या ग्रंथाचे विशेष स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. मयुरा देशमुख, डॉ. सुमेध वरघट, डॉ. सौरभ पौनिकर, डॉ. प्रीतम पाल आणि श्री अभिषेक कडू यांच्यासह विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापकांची प्रमुख उपस्थिती लाभली.



# विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागात अभियांत्रिकी दिन उत्साहात साजरा



प्रमुख अतिथी डॉ. मो. अतिक यांचे स्वागत करतांना केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक व विद्यार्थी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अभियंता दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, तर प्रमुख अतिथी म्हणून संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.मो. अतिक उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ.मो. अतिक यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याकरिता दहा कलमी प्रोग्राम व नियोजनाचे महत्व विषद केले. अध्यक्षीय भाषणातून केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक म्हणाले, मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी केलेली कामे आजही सुस्थितीत कार्यरत असून आधुनिक अभियांत्रिकी क्षेत्रातील नवोन्मेष, नीतिमत्ता व शाश्वत विकासाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. अभियांत्रिकी ही केवळ यंत्रांची भाषा नसून समाजाचे भविष्य घडविण्याची जबाबदारी असल्याचेही ते म्हणाले. अभियंतानी देशाच्या विकासात केलेल्या कार्याचे सउदाहरण महत्व विषद करुन मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जीवनकार्यावर त्यांनी याप्रसंगी प्रकाश टाकला.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर विश्वेश्वरय्या व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश येलने व कु. मुगुल यांनी, तर आभार संकेत वारे याने मानले. विद्यार्थ्यांच्या आयोजन समितीने प्रा. यश तांबे यांच्या नियंत्रणात उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. कार्यक्रमाला विभागातील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



# भारतीय ज्ञानपरंपरेत संस्कृत भाषा महत्त्वपूर्ण - डॉ. संदीप वाघुळे
# विद्यापीठात विश्व संस्कृत दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

भारतीय ज्ञानपरंपरेत संस्कृत या प्राचीन ज्ञानभाषेचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. संस्कृत भाषेतील संस्कृती नव्या अभ्यासक आणि संशोधानासाठी फार उपयुक्त आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश असून त्यातील चिकित्सक ज्ञानग्रहणासाठी संस्कृत भाषेचे ज्ञान नव्या विद्यार्थ्यांनी अवगत करावे, असे प्रतिपादनात्मक आवाहन विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तथा आय.क्यु.ए.सी. चे संचालक डॉ. संदिप वाघुळे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभाग आणि संस्कृत भारती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विश्व संस्कृत दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषणातून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून विद्यापीठातील संस्कृत अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. स्वानंद पुंड, प्रमुख अतिथी म्हणून अमरावती येथील संस्कृत भारतीचे जनपद–अध्यक्ष श्री. देवदत्त कुळकर्णी, महानगर अध्यक्ष डॉ. विलोभ भारतीय व संस्कृत विभागाचे समन्वयक डॉ. किशोर राऊत व्यासपीठावर उपस्थित होते.

सर्वप्रथम उद्घाटक डॉ. स्वानंद पुंड यांनी विश्व संस्कृत दिनाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. ते पुढे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून संस्कृत शिक्षणाला चालना मिळाली. व्यवहारातील शिक्षण, संस्कृती, गुण, कौशल्य व रोजगार निर्मिती यावर भाष्य करताना आचार्य विनोभा भावे यांच्या कार्याचा उल्लेख करीत डॉ. पुंड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. भारतीय ज्ञानपरंपरा आणि संस्कृत भाषा यांच्यातील अनोन्य संबंध स्पष्ट करून त्यांनी संस्कृत भाषेचे महत्त्व अधोरेखित केले.



अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना डॉ. संदिप वाघुळे

सर्वांनी संस्कृत भाषा बोलण्यासाठी शिकावी व त्याची ज्ञानसंपदा जतन करावी, असे मत डॉ. विलोभ भारतीय यांनी मांडले. याप्रसंगी संस्कृत विभागाचे समन्वयक डॉ. किशोर राऊत यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका स्पष्ट करून प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीच्या संशोधनातील संस्कृत भाषेचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमादरम्यान २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात एम.ए. संस्कृतमध्ये प्रथम मेरीट व सुवर्णपदक प्राप्त केलेल्या विभागातील माजी विद्यार्थीनी अमृता कोरडे यांसह २०२५–२६ मध्ये विभागातील सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थी डॉ. योगेन्द्र उपाध्ये यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्ना यावले, सूत्रसंचालन आणि अतिथींचा परिचय जान्हवी परांजपे हिने, तर आभार डॉ. राहुल लोधा यांनी मानले. कार्यक्रमाला मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

---

## विद्यापीठातील जीवतंत्रशास्त्र विभागात .. 'ध्येयनिर्मिती : आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' विषयावर व्याख्यान संपन्न



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जीवतंत्रशास्त्र विभागातर्फे 'ध्येयनिर्मिती : आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर नुकतेच विशेष व्याख्यान संपन्न झाले. विद्यापीठाच्या सेवानिवृत्त सहा. कुलसचिव डॉ. स्मिता साठे यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैयक्तिक व व्यावसायिक ध्येय निश्चित करणे, त्यांचा पाठपुरावा करणे आणि ती प्रभावीपणे साध्य करण्यासाठी वैज्ञानिक नियोजन आणि आध्यात्मिक ज्ञानाचा मेळ कसा घातल्या जातो, हे सउदाहरण सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. प्रशांत ठाकरे, श्री सुदर्शन कोवे, कु. अनघा उंदिरवाडे, कु. मैथिली उगले यांनी विशेष परिश्रम घेतले. जीवतंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. व्याख्यानाच्या माध्यमातून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास, मानसिक समतोल आणि ध्येयपूर्तीसाठीच्या अचूक धोरणांविषयी मोलाचे व व्यावहारिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले असल्याचे मत डॉ. पाटील यांनी व्यक्त केले.



सूप्रसिध्द वक्ते डॉ. स्मिता साठेसह इतर मान्यवर, विद्यार्थी व विद्यार्थीनी



## अमरावती विद्यापीठात ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्रामध्ये ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठ आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. संदिप वाघुळे यांनी ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राचे संचालक डॉ. एस. पी. जोशी तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जयंती कार्यक्रमाचे संचालन डॉ. एस. पी. जोशी यांनी केले. ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्याबद्दल माहिती डॉ. संदिप वाघुळे यांनी दिली.



## अमरावती विद्यापीठात श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रामध्ये श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला . यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर यांनी श्रीचक्रधरस्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. अभिवादन कार्यक्रमाला विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. महंत सोनपेठकर, तसेच विद्यापीठातील आणि महानुभाव अध्यासन केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व माहिती महानुभाव अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. महंत सोनपेठकर यांनी दिली.



# विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व प्रबोधनकार ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



# विद्यापीठात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक जयंती साजरी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व राजे उमाजी नाईक यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



जयंती कार्यक्रमाला उपस्थित कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व इतर



# विद्यापीठात पंडित दिनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पंडित दिनदयाल उपाध्याय यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, सहा.कुलसचिव डॉ. साक्षी ठाकूर, डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्याबद्दल माहिती डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.

---

## The Hitavada




### When actions speak louder than words...

The art of saying everything without saying anything. Students participating in the four-day 'Sansparsh Yuva Mahotsav' in Buldhana present a mime, an artform that is all expression and no words. More than 2,000 young artists from colleges across five districts of Akola, Amravati, Yavatmal, Washim and Buldhana are participating in the festival organised by the SGBAU on sprawling campus of Rajarshi Shahu College of Engineering.

(Pic by Ravikiran Takalkar)

रोज सकाळी प्रकाशित होणारे
अमरावती इव्हिनिंग

# कर्मचाऱ्यांच्या समर्पणामुळेच विद्यापीठाची जागतिक पातळीवर घोडदौड

## विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त कर्मचा-यांचा 'कर्तव्यपूर्ती सोहळा'



अमरावती दि. दि. ३१ :- अनेक प्रशासकीय अडचणी, लाल फीतीचा कारभार आणि रिक्त पदांची वानवा असतानाही, विद्यापीठाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या अहोरात्र कष्टांमुळे विद्यापीठाने मानाच्या 'क्यूएस वर्ल्ड रँकिंग'मध्ये जागतिक स्तरावर १०००-१२०० च्या व दक्षिण आशियात ३३० व्या क्रमांकावर मजल मारली आहे. पदे रिक्त असतानाही कर्मचाऱ्यांनी दोन ते तीन टेबलचे काम आणि अतिरिक्त जबाबदा-या सांभाळत विद्यापीठाचा कारभार सुरळीत ठेवला. अडचणींवर मात करत कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट सहकार्यामुळे आज विद्यापीठाला हे जागतिक यश प्राप्त झाले आहे. ही अत्यंत प्रतिष्ठित मानली जाणारी रँकिंग आहे. भविष्यातही अधिकारी आणि कर्मचारी यांच्या याच सहकार्यामुळे विद्यापीठाचा प्रवास अधिक गतीने होईल आणि संस्था उत्तरोत्तर प्रगती करेल. अनेक संकटांचा सामना करत विद्यापीठाने गाठलेले हे उच्च शिखर संपूर्ण विद्यापीठ परिवारासाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी आयोजित 'कर्तव्यपूर्ती सोहळ्यात' अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच सत्कारमूर्ती श्री गणेश गोविंदराव व्यवहारे, सौ. व्यवहारे, सौ. अंजली देवानंद गणोरकर, श्री देवानंद गणोरकर, सौ. रजनी सुनिल चपाटे, श्री सुनिल चपाटे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सत्कारमूर्तींचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर सौ. व्यवहारे यांचा सौ. मोनाली तोटे पाटील, सौ. अंजली गणोरकर यांचा सौ. पुनम जाधव, सौ. रजनी चपाटे यांचा सौ. मनिषा कु-हेकर यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. विद्या शर्मा म्हणाल्या, सेवानिवृत्तीचा एक प्रवास संपला असला तरी आता खरा प्रवास सुरू झाला आहे. या प्रवासादरम्यान आपण खूप काही शिकलो, अनुभवले. आता दुस-या प्रवासासाठी सुध्दा आपण तयार असले पाहिजे. महिलांना अतिशय धावपळीचे काम करावे लागते. त्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. परंतु आरोग्याकडे अधिक लक्ष द्यावे असे सांगून डॉ. शर्मा यांनी सर्व सत्कारमूर्तींना निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनीही आपल्या मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सत्कारमूर्ती श्री गणेश व्यवहारे, सौ. अंजली गणोरकर, सौ. रजनी चपाटे यांनी आपल्या मनोगतातून सेवाकाळात सहका-यांकडून मिळालेला प्रेम, आदरभाव याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करून सेवाकाळात केलेल्या कार्याची त्यांनी माहिती दिली.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने कोषाध्यक्ष श्री राजेश एडले, सौ. प्रज्ञा बोंडे, डॉ. नितीन कोळी यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

# जीवन जगताना संत साहित्यच खरा मार्गदर्शक

## डॉ. अलका इंदापवार, 'श्री गुलाबराव महाराज एक अलौकिक संत'वर व्याख्यानमाला

**प्रतिनिधी | अमरावती**



व्याख्यानमालेत मंचावर उपस्थित डॉ. अलका इंदापवार यांच्यासह इतर मान्यवर.

'मानवी जीवन जगत असताना अनेक अडचणी, संकटे आणि वैचारिक गोंधळ समोर येतात. अशा वेळी योग्य दिशा दाखवून जीवनाला अचूक मार्ग दाखवण्याचे काम केवळ संत साहित्य आणि थोर संतांचे विचारच करू शकतात,' असे प्रतिपादन नागपूर येथील वक्त्या डॉ. अलका इंदापवार यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाच्या संयुक्त सहकार्याने प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालयात झाली त्याप्रसंगी 'श्री गुलाबराव महाराज एक अलौकिक संत' यावर व्याख्यान देतांना त्या बोलत होत्या. या वेळी अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, श्री गणेशदास राठी छात्रालय समितीचे अध्यक्ष वसंतकुमार मालपाणी, माजी न्यायमूर्ती सुदाम देशमुख, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, दानदात्यांचे प्रतिनिधी डॉ. अरविंद देशमुख, प्राचार्य डॉ.व्ही.एम. भांगडिया व विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. इंदापवार पुढे म्हणाल्या, सामान्य प्राण्याला जीवन जगण्याचे अंतिम सत्य, आत्मिक सुख मिळवून देण्यासाठी संतांनी आयुष्य वेचले आहे.

दादासाहेब खापर्डे यांनी गुलाबराव महाराजांचा उल्लेख 'चालता-बोलता विश्वकोश' असा केला होता, तर बापूजी अणे यांनी त्यांच्या ग्रंथांमधील अभ्यासाचे कौतुक केले होते. गानकोकिळा लता मंगेशकर यांनी गुलाबराव महाराजांच्या चरित्राची प्रस्तावना वाचताना संतांचे अलौकिक कार्य पाहून आपण थक्क झाल्याचे म्हटले होते.

गोविंदगिरीजी महाराज यांनी गुलाबराव महाराजांना 'युगाचार्य' असे संबोधत त्यांच्या ग्रंथसंपदेतील ११ निकषांचा गौरव केला आहे.माणूस अनेकदा भौतिक सुख-सुविधांच्या मागे धावताना स्वतःला,मूळ अस्तित्वाला विसरून जातो. आपल्याला हवे असलेले खरे सुख आपल्यातच असताना आपण ते जगात चुकीच्या ठिकाणी शोधत असतो. संत तुकाराम महाराजांनी देखील तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी असे सांगितले आहे. आद्य शंकराचार्य असोत, ज्ञानेश्वर महाराज असोत किंवा इतर संत परंपरा, या सर्व महापुरुषांनी स्वार्थ न ठेवता माणसाचे कल्याण व्हावे, मानवी समाज दुःखातून मुक्त व्हावा, सर्वांना भगवंताची प्राप्ती करता यावी, यासाठी कष्ट घेतले. त्यांनी सुखाचा त्याग करून समाजाला योग्य दिशा दाखवली. म्हणूनच,धावपळीच्या, तणावपूर्ण युगात संतांचे चरित्र ऐकणे, वाचणे, त्यांच्या विचारांचे आचरण करणे, ही काळाची गरज झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली असून, जिल्ह्यात अनेक महान संत होऊन गेले. या संतांच्या विचारांचा व साहित्याचा अभ्यास करावा, यासाठी अशाप्रकारच्या व्याख्यानाच्या आयोजनाचे उद्दिष्ट आहे. कार्यक्रमाला संत गुलाबराव महाराजांचे भाविक भक्त, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

The Hitavada
THE PEOPLE'S PAPER • SINCE 1911

# SGBAU pays tributes to Dr Shrikant Jichkar

**■ Amravati Bureau**
AMRAVATI, Sept 15



Dr Shrikant Waghule and others paying tributes to Dr Shrikant Jichkar.

THE birth anniversary of Dr Shrikant Jichkar was celebrated with warmth and enthusiasm at the Dr Shrikant Jichkar Memorial Research Centre at Sant Gadgebaba Amravati University recently.

Dr Sandeep Waghule, IQAC Director, paid tributes to late Dr Shrikant Jichkar on the behalf of the University by performing 'pujan' of his image and also by garlanding it.

Dr Shrikant Patil, Director of Department of Lifelong Learning and Extension at Sant Gadgebaba Amravati University, Dr S P Joshi, Director of Dr Shrikant Jichkar Memorial Research Centre along with officers and staffers at Sant Gadgebaba Amravati University were prominently present on the occasion.

Dr Sandeep Waghule provided information about the works and personality of Dr Shrikant Jichkar. All the present officers and staffers offered floral obeisance to Dr Shrikant Jichkar.

आपली मातृभूमि

# महानुभाव पंथ आणि 'लीळाचरित्र' हे मराठी साहित्यातील अमूल्य धन

## डॉ.अण्णा वैद्य यांचे प्रतिपादन, 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' विषयावर व्याख्यान



**आमा प्रतिनिधी/१४ सप्टेंबर**

**अमरावती** – अमरावती विद्यापीठ परिसरात सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी आणि 'लीळाचरित्र' या विषयावर एक अभ्यासपूर्ण विशेष व्याख्यान नुकतेच पार पडले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध वक्ते अण्णा वैद्य यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, हा ग्रंथ केवळ धार्मिक नसून मानवी जीवनाला नैतिकतेची योग्य दिशा दाखवणारा एक महान वैचारिक ठेवा आहे. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली असून, मान्यवरांच्या हस्ते स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सीमामयी मेटकर यांनी प्रास्ताविक केले, सूत्रसंचालन संदीप जुनघरे यांनी तर आभार प्रदर्शन राजेंद्र सोरठे यांनी पार पाडले. व्याख्यानात पुढे स्पष्ट करण्यात आले की, लीळाचरित्र हा ग्रंथ कोणतीही काल्पनिक कथा नसून चक्रधर स्वामींच्या आयुष्यातील प्रत्यक्ष घटनांवर आधारित आहे. महानुभाव पंथाचा विचार हा अत्यंत प्रेमळ, जिव्हाळ्याचा आणि नैतिकतेला धरून असून यात अंधश्रद्धा किंवा दांभिकतेला कोणतेही स्थान नाही. राजा- राजवाड्यांच्या इतिहासासोबतच शेतकरी, ग्वालर, सुतार, कुंभार आणि सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील नोंदी यात अतिशय सूक्ष्मपणे मांडल्या गेल्या आहेत. पैठण येथून सुरू झालेला हा एकात्मवाद, अद्वैत आणि ज्ञानमोचक विचार समाजात नैतिक व सात्त्विक ज्ञान पसरवणारा ठरला असून, हा विचार आता भारताच्या ज्ञान प्रणालीचा महत्त्वाचा भाग बनला आहे. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्र-कुलगुरू महेंद्र ढोरे यांनी स्पष्ट केले की, याप्रसंगी व्यासपीठावर व्ही. एम. मेटकर, सुभाष पावडे, अमोल ठाकरे, राजेंद्र सोरठे आणि संदीप जुनघरे यांच्यासह शहरवासीयांची व भाविकांची मोठी उपस्थिती होती.

हिंदुस्थान

पुरोगामी राष्ट्रीय विचारांचे दैनिक

# महानुभाव पंथ आणि 'लीळाचरित्र' हे मराठी साहित्यातील अमूल्य धन : डॉ. अण्णा वैद्य



अमरावती दि. १५ : श्री चक्रधर स्वामींचे जीवनचरित्र आणि 'लीळाचरित्र' अमूल्य ठेवा असून त्यात केवळ धार्मिकता नसून मानवी जीवनाला नैतिकतेची दिशा देणारा एक मोठा वैचारिक ठेवा आहे, असे प्रतिपादन सुप्रसिध्द वक्ते डॉ. अण्णा वैद्य यांनी केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, श्री सुभाष पावडे, अधिसभा सदस्य ॲड. अमोल ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक महंत डॉ. राजेंद्र सोनपेठकर, डॉ. संदीप जुनघरे उपस्थित होते.

व्याख्यानाची मांडणी करताना डॉ. वैद्य म्हणाले, लीळाचरित्र हा ग्रंथ कोणतीही कल्पित कथा नसून श्री चक्रधर स्वामींच्या आयुष्यात प्रत्यक्ष घडलेल्या घटनांवर आधारित आहे. माईभट्ट यांच्या लेखणीतून आणि नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हा ग्रंथ तयार झाला असून, मराठी भाषेच्या साहित्यात यासारखा दुसरा ग्रंथ नाही. या ग्रंथात राजेरजवाडएांच्या इतिहासाबरोबरच शेतकरी, गुराखी, सुतार, कुंभार आणि सामान्य लोकांच्या जीवनातील नोंदी व त्यांचे प्रश्न अत्यंत सूक्ष्मपणे मांडले गेले आहेत. महानुभाव पंथाचा विचार हा अत्यंत प्रेमळ, जिव्हाळ्याचा आणि नैतिकतेला धरून आहे. यात कोणत्याही प्रकारच्या बळजबरीला किंवा दांभिकतेला स्थान नाही. स्वामींनी आपल्या कृतीतून सर्वसामान्यांचे दुःख समजून घेतले आणि त्यांच्या व्यथा-वेदना दूर करण्याचा प्रयत्न केला.

पैठण येथून सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी सुरू केलेला ऐकेश्वरवादी, अद्वैती आणि 'ज्ञानमोचक' विचार समाजात नैतिक व सात्त्विक ज्ञान पसरवणारा ठरला आहे. ते पुढे म्हणाले, मठ, मंदिरे आणि विविध संमेलनांच्या माध्यमातून हा विचार घराघरांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. हा विचार भारतीय ज्ञान प्रणालीचा एक महत्त्वाचा भाग बनला असून, या तत्त्वज्ञानाचा प्रसार विविध पातळ्यांवर होत आहे. महानुभाव पंथाचा हा विचार मानवी कल्याण साधणारा असून, प्रत्येकाने या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून आपल्या जीवनात त्याचा अंगीकार करावा, असा सूर या व्याख्यानातून व्यक्त करण्यात आला.

अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, वक्त्यांनी 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व सुलभ विवेचन करून श्री चक्रधर स्वामींच्या जीवनकार्याचा आलेख मांडताना, त्यांनी सर्वसामान्यांच्या वेदना आणि यातनांचे निवारण करण्यासाठी केलेल्या अनंत लीलांचे प्रातिनिधिक स्वरूपात सुंदर चित्रण व्याख्यानातून मांडले आहे. सृष्टीच्या निर्मितीपासून ते अंतापर्यंतचे संपूर्ण तत्त्वज्ञान श्री चक्रधर स्वामींच्या कार्यामध्ये कसे सामावलेले आहे, हे अत्यंत सोप्या शब्दांत उपस्थितांसमोर ठेवले. अशा महान विचारांची देवाणघेवाण विविध व्यासपीठांवर व्हावी, आणि या कार्यात सर्वांनी आपला हातभार लावावा, अशी अपेक्षा अध्यक्षीय मनोगतात त्यांनी व्यक्त केली.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सौ. संस्कृती काळे यांनी सुंदर रीतीने स्तवन सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सौ सीमाताई मेटकर, संचालन डॉ. संदीप जुनघरे, तर आभार महंत डॉ. राजेंद्र सोनपेठकर यांनी मानले. कार्यक्रमाला सौ. प्रतिभा भूगुल, सौ. शोभा देशमुख, सौ. रजनी घोरमाडे, श्री अनंत तेलखडे, श्री मनीष देशमुख, सौ. रजनीताई तायडे, श्री अशोक धाबे, श्री सतीश मानकर, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच गणमान्य नागरिक, भाविक भक्त मोठएा संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठातील श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त अभिवादन



श्रीचक्रधरस्वामींना अभिवादन करते वेळी विद्यापीठात उपस्थित मान्यवर.

**अमरावती** | संत गाडगे बाबा विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्रामध्ये श्रीचक्रधरस्वामी अवतार दिनानिमित्त विशेष अभिवादन कार्यक्रम उत्साहात झाला. या प्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर यांनी श्रीचक्रधरस्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करून, पुष्पार्पण करून विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. दरम्यान महानुभाव अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. महंत सोनपेठकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी,महानुभाव अध्यासन केंद्रातील सदस्य उपस्थित होते. श्रीचक्रधरस्वामींचे विचार आणि त्यांचे कार्य समाजोपयोगी असून, त्यांचे स्मरण करणे ही काळाची गरज असल्याचे या प्रसंगी अधोरेखित करण्यात आले.

हिंदुस्थान

# भारतीय ज्ञानपरंपरेत संस्कृत भाषा महत्त्वपूर्ण : डॉ. संदीप वाघुळे

## विद्यापीठात विश्व संस्कृत दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न

अमरावती दि. ७ : भारतीय ज्ञानपरंपरेत संस्कृत या प्राचीन ज्ञानभाषेचे स्थान अतिशय महत्वपूर्ण आहे. संस्कृत भाषेतील संस्कृती नव्या अभ्यासक आणि संशोधानासाठी फार उपयुक्त आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश असून त्यातील चिकित्सक ज्ञानग्रहणासाठी संस्कृत भाषेचे ज्ञान नव्या विद्यार्थ्यांनी अवगत करावे, असे प्रतिपादनात्मक आवाहन विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तथा आय.क्यु.ए.सी. चे संचालक डॉ. संदिप वाघुळे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभाग आणि संस्कृत भारती, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विश्व संस्कृत दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला, त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषणातून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून विद्यापीठातील संस्कृत अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. स्वानंद पुंड,



प्रमुख अतिथी म्हणून अमरावती येथील संस्कृत भारतीचे जनपद-अध्यक्ष श्री. देवदत्त कुळकर्णी, महानगर अध्यक्ष डॉ. विलोभ भारतीय व संस्कृत विभागाचे समन्वयक डॉ. किशोर राऊत व्यासपीठावर उपस्थित होते.

सर्वप्रथम उद्घाटक डॉ. स्वानंद पुंड यांनी विश्व संस्कृत दिनाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. ते पुढे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून संस्कृत शिक्षणाला चालना मिळाली. व्यवहारातील शिक्षण, संस्कृती, गुण, कौशल्य व रोजगार निर्मिती यावर भाष्य करताना आचार्य विनोभा भावे यांच्या कार्याचा उल्लेख करीत डॉ. पुंड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. भारतीय ज्ञानपरंपरा आणि संस्कृत भाषा यांच्यातील अनोन्य संबंध स्पष्ट करून त्यांनी संस्कृत भाषेचे महत्त्व अधोरेखित केले.

सर्वांनी संस्कृत भाषा बोलण्यासाठी शिकावी व त्याची ज्ञानसंपदा जतन करावी, असे मत डॉ. विलोभ भारतीय यांनी मांडले. याप्रसंगी संस्कृत विभागाचे समन्वयक डॉ. किशोर राऊत यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका स्पष्ट करून प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीच्या संशोधनातील संस्कृत भाषेचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमादरम्यान २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एम.ए. संस्कृतमध्ये प्रथम मेरीट व सुवर्णपदक प्राप्त केलेल्या विभागातील माजी विद्यार्थीनी अमृता कोरडे यांसह २०२५-२६ मध्ये विभागातील सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थी डॉ. योगेन्द्र उपाध्ये यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्ना यावले, सूत्रसंचालन आणि अतिथींचा परिचय जान्हवी परांजपे हिने, तर आभार डॉ. राहुल लोधा यांनी मानले. कार्यक्रमाला मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

हिंदुस्थान

# विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागात अभियांत्रिकीदिन साजरा



अमरावती : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागात भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अभियंतादिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, तर प्रमुख अतिथी म्हणून संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. मो. अतिक उपस्थित होते. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन यश येलने व मुगुल यांनी, तर आभार प्रदर्शन संकेत वारे याने केले.

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group



# शिक्षा व सामाजिक कार्य में डॉ. जिचकार का था उल्लेखनीय योगदान

## जयंती कार्यक्रम में डॉ. वाघुले ने कहा

भास्कर प्रतिनिधि | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ के डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति अनुसंधान केंद्र में सोमवार को डॉ. श्रीकांत जिचकार की जयंती श्रद्धापूर्वक मनाई गई। इस अवसर पर विद्यापीठ के आईक्यूएसी निदेशक डॉ. संदीप वाघुले ने डॉ. जिचकार की प्रतिमा का पूजन कर पुष्प अर्पित किए। उन्होंने विद्यापीठ की ओर से उन्हें श्रद्धांजलि अर्पित की।

कार्यक्रम में आजीवन अध्ययन एवं विस्तार विभाग के निदेशक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति अनुसंधान केंद्र के निदेशक डॉ. एस.पी. जोशी सहित विद्यापीठ के अधिकारी एवं कर्मचारी उपस्थित रहे। इस अवसर पर डॉ. संदीप वाघुले ने डॉ. श्रीकांत जिचकार के बहुआयामी व्यक्तित्व और उनके उल्लेखनीय कार्यों पर प्रकाश डाला। उन्होंने कहा कि डॉ. जिचकार ने शिक्षा, सामाजिक कार्य, प्रशासन और सार्वजनिक जीवन के क्षेत्र में महत्वपूर्ण योगदान दिया। ज्ञान के प्रति उनकी गहरी प्रतिबद्धता और समाज के प्रति समर्पण आज भी युवाओं के लिए प्रेरणादायी है। कार्यक्रम का संचालन डॉ. एस.पी. जोशी ने किया।

नवराष्ट्र

## डॉ. अण्णा वैद्य यांचे प्रतिपादन; विद्यापीठात व्याख्यान

# चक्रधर स्वामींचे लीळाचरित्र अमूल्य ठेवा

▶ अमरावती, ब्युरो. श्री चक्रधर स्वामींचे जीवनचरित्र आणि 'लीळाचरित्र' अमूल्य ठेवा असून त्यात केवळ धार्मिकता नसून मानवी जीवनाला नैतिकतेची दिशा देणारा एक मोठा वैचारिक ठेवा आहे, असे प्रतिपादन सुप्रसिध्द वक्ते डॉ. अण्णा वैद्य यांनी केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, सुभाष पावडे, अधिसभा सदस्य ॲड. अमोल ठाकरे, महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक महंत डॉ. राजेंद्र सोनपेठकर, डॉ. संदीप जुनघरे उपस्थित होते. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संस्कृती काळे यांनी सुंदर रीतीने स्तवन सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सीमा मेटकर, संचालन डॉ. संदीप जुनघरे, तर आभार महंत डॉ. राजेंद्र सोनपेठकर यांनी मानले. कार्यक्रमाला प्रतिभा भुगुल, शोभा देशमुख, रजनी घोरमाडे, अनंत तेलखडे, मनीष देशमुख, रजनी तायडे, अशोक धाबे, सतीश मानकर, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच गणमान्य नागरिक, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. ढोरे म्हणाले, वक्त्यांनी 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व सुलभ विवेचन करून श्री चक्रधर स्वामींच्या जीवनकार्याचा आलेख मांडताना, त्यांनी सर्वसामान्यांच्या वेदना आणि यातनांचे निवारण करण्यासाठी केलेल्या अनंत लीलांचे प्रातिनिधिक स्वरुपात सुंदर चित्रण व्याख्यानातून मांडले.



### मराठीच्या साहित्यात यासारखा दुसरा ग्रंथ नाही

व्याख्यानाची मांडणी करताना डॉ. वैद्य म्हणाले, लीळाचरित्र हा ग्रंथ कोणतीही कल्पित कथा नसून श्री चक्रधर स्वामींच्या आयुष्यात प्रत्यक्ष घडलेल्या घटनांवर आधारित आहे. माइंभट्ट यांच्या लेखणीतून आणि नागदेवाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हा ग्रंथ तयार झाला असून, मराठी भाषेच्या साहित्यात यासारखा दुसरा ग्रंथ नाही. या ग्रंथात राजेरजवाडाच्या इतिहासाबरोबरच शेतकरी, गुराखी, सुतार, कुंभार आणि सामान्य लोकांच्या जीवनातील नोंदी व त्यांचे प्रश्न अत्यंत सूक्ष्मपणे मांडले आहेत.

---

दैनिक दिव्य मराठी

A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

**प्रबोधन** • : डॉ. अण्णा वैद्य, विद्यापीठात 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' वर व्याख्यान

# महानुभाव पंथ, 'लीळाचरित्र' हे अमूल्य धन

प्रतिनिधी | अमरावती

श्री चक्रधर स्वामींचे जीवनचरित्र 'लीळाचरित्र' हा मराठी साहित्याचा अमूल्य ठेवा आहे. या ग्रंथात धार्मिक विचार नसून, मानवी जीवनाला नैतिकतेची दिशा देणारा व्यापक वैचारिक आशय आहे, असे प्रतिपादन डॉ. अण्णा वैद्य यांनी केले. विद्यापीठात 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' यावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे होते. या वेळी डॉ. व्ही.एम. मेटकर, सुभाष पावडे, ॲड. अमोल ठाकरे, डॉ. राजेंद्र सोनपेठकर, डॉ. संदीप जुनघरे यांची उपस्थिती होती. या वेळी डॉ. वैद्य यांनी 'लीळाचरित्र'च्या साहित्यिक, सामाजिक महत्त्वावर प्रकाश टाकताना सांगितले की, हा ग्रंथ कल्पित कथा नसून, श्री चक्रधर स्वामींच्या जीवनातील घटनांवर आधारित आहे. महानुभाव पंथाचा विचार हा प्रेम, जिव्हाळा, नैतिकतेवर आधारित असून त्यात बळजबरी किंवा दांभिकतेला स्थान नाही. श्री चक्रधर स्वामींनी सर्वसामान्यांच्या जीवनातील दुःख, व्यथा, वेदना समजून घेत त्यांच्या निवारणासाठी प्रयत्न केले. पैठण येथून त्यांनी मांडलेला ऐकेश्वरवादी, अद्वैती 'ज्ञानमोचक' विचार समाजात नैतिक व सात्त्विक ज्ञानाचा प्रसार करणारा ठरला, असेही डॉ. वैद्य यांनी स्पष्ट केले. मठ, मंदिरे, संमेलनांतून



व्याख्यानाला व्यासपिठावर उपस्थित मान्यवर.

महानुभाव पंथाचा विचार समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य सुरू आहे. भारतीय ज्ञानप्रणालीमध्येही या विचाराचे महत्त्वाचे स्थान असून, मानवी कल्याणाचा विचार या तत्त्वज्ञानात असल्याने प्रत्येकाने त्याचा अभ्यास करून जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी डॉ. वैद्य यांनी 'सर्वसामान्यांचे कैवारी श्री चक्रधर स्वामी' याचे सुलभ विवेचन केल्याचे सांगितले. श्री चक्रधर स्वामींनी सर्वसामान्यांच्या वेदना निवारण्यासाठी केलेल्या कार्याचे चित्रण व्याख्यानातून मांडले. सृष्टीच्या निर्मितीपासून अंतापर्यंतचे तत्त्वज्ञान त्यांच्या कार्यात कसे सामावलेले आहे, हे सोप्या भाषेत मांडले. अशा महान विचारांची देवाणघेवाण होणे गरजेचे असून, या कार्यात सर्वांनी योगदान द्यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली आहे. प्रास्ताविक प्रा.सीमा मेटकर यांनी केले. संचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले, तर आभार महंत डॉ. राजेंद्र सोनपेठकर यांनी मानले.

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

## प्रथम कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख व्याख्यानमाला उत्साहात
# कौशल्य विकास, स्वायत्ततेवर विशेष भर देणे काळाची गरज : प्राचार्य राव

प्रतिनिधी | अमरावती

बदलत्या जागतिक प्रवाहात केवळ पारंपरिक शिक्षण आणि पदवी मिळविण्यापेक्षा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये देणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना नवीन कौशल्ये देण्यासाठी महाविद्यालयांनी स्वायत्त होऊन त्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यबल गटाचे सदस्य तथा वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अनिल राव यांनी केले. विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रथम कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख व्याख्यानमालेत 'उच्च शिक्षण : वेध परिवर्तनाचा' या विषयावर ते बोलत होते.

यावेळी माजी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर,विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, माजी सहसंचालक डॉ. केशव तुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना प्रा. राव म्हणाले की, आजच्या काळात एका क्लिकवर विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध होत असल्याने शिक्षकांची भूमिका केवळ शिकविण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. शिक्षकांनी फॅसिलिटेटर आणि मेंटॉरची भूमिकाही पार पाडली पाहिजे. विद्यार्थ्यांचा पारंपरिक अभ्यासक्रमांकडे असलेला ओढा कमी होत असून रोजगारासाठी आवश्यक असलेली कौशल्ये देणारे अभ्यासक्रम विकसित करणे गरजेचे आहे. स्थायी नोकऱ्यांचे स्वरूप बदलत असल्याने युवकांनी स्वयंपूर्ण होण्यासाठी 'लाईफ लाँग लर्निंग'वर भर देणे आवश्यक आहे. कुलगुरू डॉ. बारहाते अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी विद्यापीठात सुरू झाली आहे. विद्यापीठाने सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या पाचव्या सत्रात 'फाऊंडेशन ऑफ एआय' हा अभ्यासक्रम सक्तीचा केला असून त्याचे गुण गुणपत्रिकेवर दर्शविले जाणार आहेत.

विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी प्रास्ताविक केले. संचालन डॉ. मंदा नांदुरकर यांनी, तर आभार प्रा. ममता म्हस्की यांनी मानले. यावेळी प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक उपस्थित होते.

हिंदुस्थान

# अमरावती विद्यापीठात ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती साजरी



अमरावती दि. १४ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्रामध्ये ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यापीठ आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. संदिप वाघुळे यांनी ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राचे संचालक डॉ. एस. पी. जोशी तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जयंती कार्यक्रमाचे संचालन डॉ. एस. पी. जोशी यांनी केले. ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्याबद्दल माहिती डॉ. संदिप वाघुळे यांनी दिली.

# अमरावती विवि में मनाई डॉ.श्रीकांत जिचकार की जयंती



प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार

अमरावती, 14 सितंबर- संत गाडगे गाबा अमरावती विद्यापीठ के डॉ.श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्र में ज्ञानयोगी डॉ.श्रीकांत जिचकार की जयंती मनाई गई. इस अवसर पर विद्यापीठ के आंयक्यूएसी के संचालक डॉ.संदीप वाघुले ने डॉ.श्रीकांत जिचकार के तैलचित्र का पूजन करके माल्यार्पण करते हुए उन्हें विद्यापीठ की ओर से अभिवादन किया. जयंती कार्यक्रम में आजीवन अध्ययन व विस्तार विभाग के संचालक डॉ.श्रीकांत पाटिल, डॉ.श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्र के संचालक डॉ.एस.पी. जोशी उसी प्रकार विद्यापीठ के अधिकारी व कर्मचारी उपस्थित थे.

पुण्य नगरी

# उच्च शिक्षणात कौशल्य विकास, स्वायत्ततेवर भर देणे काळाची गरज

**प्राचार्य अनिल राव यांचे प्रतिपादन**

**प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख व्याख्यानमाला उत्साहात**



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती** : बदलत्या जागतिक परिस्थितीत उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली असून, केवळ पदवी मिळविण्यापेक्षा विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख व कौशल्यपूर्ण बनविणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी स्वायत्तता स्वीकारून विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार आधुनिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यबल गटाचे सदस्य तथा वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अनिल राव यांनी केले.

विद्यापीठ जनसंपर्क विभाग व मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख व्याख्यानमालेत उच्च शिक्षण : वेध परिवर्तनाचा या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य राव म्हणाले की, आज एका क्लिकवर विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध होत असल्याने शिक्षकांनी केवळ अध्यापनाची भूमिका न बजावता फॅसिलिटेटर आणि मेंटॉर म्हणूनही काम करणे गरजेचे आहे. पारंपरिक अभ्यासक्रमांपेक्षा कौशल्याधारित शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. त्यामुळे रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये अभ्यासक्रमात समाविष्ट करणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या प्रभावाच्या काळात विद्यार्थ्यांची विचारक्षमता, विश्लेषणात्मक दृष्टी आणि सर्जनशीलता विकसित करण्यावरही भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. उच्च शिक्षणातील मुली तसेच अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग हा सामाजिक व शैक्षणिक समतेचा सकारात्मक टप्पा असल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र, वाढते खासगीकरण आणि शिक्षणाची गुणवत्ता टिकविण्याचे आव्हान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची विद्यापीठात अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या पाचव्या सत्रात फाऊंडेशन ऑफ एआय हा अभ्यासक्रम सक्तीचा करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांच्या विद्यापीठ उभारणीतील योगदानाचा गौरव केला. कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

रोज सकाळी प्रकाशित होणारे
अमरावती इव्हिनिंग

# गृहविज्ञान विभागात 'राष्ट्रीय पोषण माह २०२६' 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' या संकल्पनेतून पोषण जनजागृतीपर संदेश




अमरावती दि. ३ :- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागात नुकतेच राष्ट्रीय पोषण माह २०२६ चे उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटक म्हणून गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, तर प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त अंगणवाडी पर्यवेक्षिका पुष्पा चिखलकर उपस्थित होत्या. यावर्षीच्या राष्ट्रीय पोषण माहची 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' ही मुख्य संकल्पना असून, आहारातील विविधता, प्रथिनांचे योग्य प्रमाण, ताजे व गरम शिजवलेला आहार, सामुदायिक जबाबदारी, बालविकासासाठी पोषण, पोषणविषयी व आहाराविषयी शासकीय योजना या सहसंकल्पनेच्या माध्यमातून अंगणवाडीचे महत्त्व, बालकांचे पोषण, माता व बालकांचे आरोग्य आणि समाजातील सर्व घटकांबाबत पोषणविषयक जबाबदारी याबाबत जनजागृती करण्याचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी त्या म्हणाल्या, राष्ट्रीय पोषण माह च्या व्यापक संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करताना अंगणवाडीच्या कार्यात केवळ अंगणवाडी सेविकांचीच नव्हे, तर पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि संपूर्ण समाजाची जबाबदारी असते. बालकांच्या पोषणाची योग्य काळजी घेणे, संतुलित आहाराबाबत जनजागृती करणे, माता व बालकांच्या आरोग्याकडे लक्ष देणे तसेच पोषणविषयक योग्य सवयी समाजात रुजविण्याची गरज असून सुदृढ बालक म्हणजे सुदृढ कुटुंब आणि सुदृढ समाजाचा पाया असल्याचेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी त्यांनी राष्ट्रीय पोषण माहची संकल्पना आणि त्यामागील उद्देश याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

निवृत्त अंगणवाडी पर्यवेक्षिका पुष्पा चिखलकर यांनी राष्ट्रीय पोषण माह च्या निमित्ताने गृहविज्ञान विभागात Nutritional Schemes Run Under ICDS या विषयांतर्गत बालकांसाठी दिल्या जाणाऱ्या पूरक आहाराचे महत्व व फायदे, तसेच शासनामार्फत बालक, गर्भवती महिला व स्तनदा मातांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध पोषण योजना व कार्यक्रम तसेच स्तनदा मातांना मिळणारा भत्ता व आर्थिक मदत आदींची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन त्यांनी केले.

राष्ट्रीय पोषण माहच्या उद्घाटनासाठी गृहविज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा वापर करून आकर्षक व संदेशपर उद्घाटन बोर्ड तयार केला. या बोर्डवर राष्ट्रीय पोषण माहची थीम तसेच पोषण आणि अंगणवाडीच्या महत्त्वाशी संबंधित संदेश प्रभावीपणे मांडण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेतून साकारलेला हा बोर्ड कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला. तसेच 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' या थीमला अनुसरून विद्यार्थ्यांनी विभागाच्या परिसरात सुंदर आणि आकर्षक रांगोळी काढली. रांगोळीच्या माध्यमातून अंगणवाडी, बालपोषण, आरोग्य आणि पोषण यांचा संदेश कलात्मक पद्धतीने सादर करण्यात आला.

कार्यक्रमाला विभागातील शिक्षक सुमित गेडाम, रविशा आंबेकर, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, विशाखा खांडेकर, अनुश्री आडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी अशोक हिरे, वसंत इंगळे, चरणदास जामठे व विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

TheHitavada
THE PEOPLE'S PAPER • SINCE 1911

# National Nutrition Month 2026 inaugurated at SGBAU

**Amravati Bureau**
AMRAVATI, Sept 5

NATIONAL Nutrition Month 2026 was inaugurated with enthusiasm at the Department of Home Science of Sant Gadge Baba Amravati University, with a focus on creating awareness about child nutrition, maternal health and the importance of community participation under the theme 'Hamari Anganwadi, Hamari Zimmedari,' recently.

Dr Vaishali Dhanvijay, Head of the Department of Home Science inaugurated the programme, while Pushpa Chikhalkar, retired Anganwadi Supervisor was the chief guest.

This year's theme focuses on dietary diversity, adequate intake of proteins, fresh and freshly cooked food, community responsibility, nutrition for child development and awareness about Government schemes related to nutrition and diet. The initiative aims to highlight the importance of Anganwadis, child nutrition, maternal and child health and the responsibility of every section of society towards ensuring better nutrition.



Guests, teachers and students present for the programme.

In her inaugural address, Dr Dhanvijay explained the broader significance of the National Nutrition Month campaign. She said responsibility for the effective functioning of Anganwadis does not rest only with Anganwadi workers, but also involves parents, students, teachers and society at large.

She stressed the need to ensure proper nutrition for children, create awareness about balanced diets, pay attention to maternal and child health and promote healthy nutritional habits in society. "A healthy child forms the foundation of a healthy family and a healthy society," she said. Dr Dhanvijay also briefed the students about the theme of National Nutrition Month and its objectives.

Speaking on 'Nutritional schemes run under ICDS,' Pushpa Chikhalkar explained the importance and benefits of supplementary nutrition provided to children under various programmes. She also provided detailed information about nutrition schemes and programmes implemented by the Government for children, pregnant women and lactating mothers, besides explaining the financial assistance and benefits available to them.

Chikhalkar also responded to questions raised by students and cleared their doubts regarding various nutrition-related schemes and programmes.

As part of the inauguration, students of the Home Science Department displayed their creativity by preparing an attractive and informative board carrying the National Nutrition Month theme and messages highlighting the importance of nutrition and Anganwadis. Students also prepared an attractive rangoli in the department premises based on the theme 'Hamari Anganwadi, Hamari Zimmedari.' Through the artwork, messages related to Anganwadis, child nutrition, health and healthy dietary practices were conveyed in a creative manner.

Teachers Sumeet Gedam, Ravisha Ambekar, Deepali Bhaise, Shilpa Ingole, Aytal Kamdar, Vishakha Khandekar and Anushree Ade, along with non-teaching staff members Ashok Hire, Vasant Ingle and Charandas Jamathe and a large number of students were present on the occasion.

TheHitavada
THE PEOPLE'S PAPER • SINCE 1911

# Youths must develop willingness to serve society: Asnare

**Amravati Bureau**
AMRAVATI, Sept 5

"MERELY undergoing training is not enough; youths must also develop a strong sense of social responsibility and the willingness to serve society during emergencies," said by Dr Avinash Asnare, Registrar of Sant Gadge Baba Amravati University.

He was speaking at the concluding function of a two-day Disaster Management Training Workshop organised by the National Service Scheme (NSS) Department of Sant Gadge Baba Amravati University. Brijesh Yadav, representative of NDRF Maharashtra, Dr Vidya Sharma, Management Council member, Dr Rajiv Borkar, Director of Student Development and Dr Nilesh Kadu, NSS Director were prominantly present on the occasion.

Addressing the gathering, Dr Avinash Asnare urged NSS volunteers to develop a mindset of responding promptly to the needs of society during disasters. He said the real value of training lies in putting the acquired skills into practice when people are in distress.




Dr Avinash Asnare guiding the programme as others look on.

Dr Vidya Sharma said youths should make effective use of the training to bring about positive change in their own lives and society. She also called upon them to use their skills during disasters and create awareness among people.

During the two-day workshop, participants were trained in various aspects of disaster management and rescue operations by Brijesh Yadav and his NDRF team. The sessions covered the Disaster Management Act, 2005, dos and don'ts during disasters, disaster management kits, natural and man made disasters, CPR, FBAO, bleeding control, FWR, improvised floating devices and flood rescue operations.

Participants were also given practical training in body assessment, snakebite management, rope knots, fire safety and the use of fire extinguishers.

Dr Vijay Nagare, Management Council member and Prof Dr Prashant Vighe, Senate member visited the workshop and interacted with the participants.

Dr Neelima Davane, Yavatmal district coordinator of NSS conducted the programme, while Dr Vishal Gajbhiye, Amravati district coordinator proposed a vote of thanks. Dipali Sontakke and Piyush Wankhede, both the NSS students along with Prof Rakhi Ingle, Programme Officer shared their feedback on the workshop.

The workshop was found useful in developing not only disaster management skills but also social awareness, a spirit of volunteerism and leadership qualities among NSS Programme Officers and volunteers. As many as 195 NSS Programme Officers and 218 volunteers from colleges across all five districts participated in the two-day workshop.

The programme concluded with a rendition of the National Salute by Prof Arvind Tatte.

पुण्य नगरी

# प्रशिक्षणासोबत युवकांमध्ये सामाजिक दायित्वाची इच्छाशक्ती असणे गरजेचे

## कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचे प्रतिपादन

## विद्यापीठामध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**अमरावती :** युवकांना आपत्तीच्या काळात प्रभावीपणे मदत करता यावी, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या समारोप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रमुख अतिथी म्हणून एन.डी.आर. एफ., महाराष्ट्र राज्याचे ब्रिजेश यादव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व रोसेयो संचालक डॉ. निलेश कडू आदी व्यासपीठावर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणातून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, केवळ प्रशिक्षण घेणे पुरेसे नाही, तर प्रशिक्षणासोबत युवकांमध्ये सामाजिक दायित्वाची इच्छाशक्ती असणे गरजेचे आहे. आपत्तीच्या प्रसंगी समाजासाठी तत्परतेने काम करण्याची मानसिकता स्वयंसेवकांनी विकसित करावी, असे आवाहन सुद्धा त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यशाळेला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विजय नागरे व अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांनी भेट दिली. संचालन यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निलीमा दवणे यांनी, तर आभार जिल्हा समन्वयक डॉ. विशाल गजभिये यांनी मानले.

पुण्य नगरी

# विद्यापीठात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक जयंती साजरी



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव मंगेश वरखेडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व राजे उमाजी नाईक यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

# विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागात राष्ट्रीय पोषण माहचे उद्‌घाटन

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागात नुकतेच राष्ट्रीय पोषण माहचे उद्‌घाटन उत्साहात करण्यात आले. याप्रसंगी उद्‌घाटक म्हणून गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, तर प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त अंगणवाडी पर्यवेक्षिका पुष्पा चिखलकर उपस्थित होत्या.

'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' ही यावर्षीच्या राष्ट्रीय पोषण माहची मुख्य संकल्पना असून, आहारातील विविधता, प्रथिनांचे योग्य प्रमाण, ताजे व गरम शिजवलेला आहार, सामुदायिक जबाबदारी, बालविकासासाठी पोषण, पोषणविषयी व आहाराविषयी शासकीय योजना या सहसंकल्पनेच्या माध्यमातून अंगणवाडीचे महत्त्व, बालकांचे पोषण, माता व बालकांचे आरोग्य आणि समाजातील सर्व घटकांबाबत पोषणविषयक जबाबदारी याबाबत जनजागृती करण्याचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय पोषण माहच्या उद्‌घाटनासाठी गृहविज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा वापर करून आकर्षक व संदेशपर उद्‌घाटन बोर्ड तयार केला. या बोर्डवर राष्ट्रीय पोषण माहची थीम तसेच पोषण आणि अंगणवाडीच्या महत्त्वाशी संबंधित संदेश प्रभावीपणे मांडण्यात आले. तसेच 'हमारी अंगणवाडी, हमारी जिम्मेदारी' या थीमला अनुसरून विद्यार्थ्यांनी विभागाच्या परिसरात रांगोळी काढली. रांगोळीच्या माध्यमातून अंगणवाडी, बालपोषण, आरोग्य आणि पोषण यांचा संदेश कलात्मक पद्धतीने सादर करण्यात आला. कार्यक्रमाला विभागातील शिक्षक सुमित गेडाम, रविशा आंबेकर, दीपाली भैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, विशाखा खांडेकर, अनुश्री आडे, शिक्षकेतर कर्मचारी अशोक हिरे, वसंत इंगळे, चरणदास जामठे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवभारत

### सीएमडीआर की प्रयोगशाला का किया दौरा

# विद्यापीठ की भूमिका को विशेषज्ञों ने सराहा



■ **अमरावती, ब्यूरो.** कोरोना महामारी के भयावह दौर में क्षेत्रीय नागरिकों के लिए अत्याधुनिक आणविक जांच सुविधा उपलब्ध कराकर महत्वपूर्ण भूमिका निभाने वाले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ के सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस एंड रिसर्च के कार्यों की विदेशी शोध विशेषज्ञों ने जमकर सराहना की. बोस्टन तथा सिल्वर स्प्रिंग से आए स्वास्थ्य एवं शोध विशेषज्ञों के प्रतिनिधिमंडल ने सोमवार को सीएमडीआर का दौरा कर प्रयोगशाला की सुविधाओं और विभिन्न शोध गतिविधियों की जानकारी ली. प्रतिनिधिमंडल में एस्टर गेरेन्डास, ग्रेस मे, जैस्मिन सुंग और मेरी प्रभूदास शामिल थीं. इस दौरान वनस्पतिशास्त्र विभागाध्यक्ष डॉ. वर्षा नाठार, डॉ. के.सी. मोरे, सीएमडीआर निदेशक डॉ. प्रशांत ठाकरे तथा उपनिदेशक डॉ. नीरज घनवटे उपस्थित थे.

**परियोजनाओं की जानकारी दी :** डॉ. ठाकरे ने प्रतिनिधिमंडल को सीएमडीआर में संचालित विभिन्न परियोजनाओं की जानकारी देने के साथ कोरोना काल के दौरान प्रयोगशाला द्वारा 24 घंटे की गई जांच सेवाओं का प्रस्तुतिकरण किया. विदेशी विशेषज्ञों ने कहा कि महामारी के चरम समय में अत्यधिक दबाव के बावजूद केंद्र की तत्परता, जांच की तकनीकी सटीकता और कड़े गुणवत्ता नियंत्रण ने क्षेत्रीय स्वास्थ्य व्यवस्था को महत्वपूर्ण सहयोग दिया. उन्होंने सीएमडीआर के समुदाय-केंद्रित प्रयासों को प्रभावी मॉडल बताया. इस अवसर पर शोधार्थी पूजा मांडविया, रेणुका येंदे तथा विद्यार्थियों ने भी विशेषज्ञों से संवाद किया. भविष्य में अंतरराष्ट्रीय स्तर पर संयुक्त शोध एवं वैज्ञानिक सहयोग बढ़ाने पर सकारात्मक चर्चा हुई.

## नवराष्ट्र

# विद्यापीठाला विदेशी शिष्टमंडळाची भेट

### कोरोना काळातील उत्कृष्ट कार्याचा गौरव



▶ **अमरावती, ब्युरो.** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस अँड रिसर्च (सीएमडीआर)ला विदेशी संशोधन तज्ज्ञ व आरोग्यशास्त्रज्ञांच्या प्रतिष्ठित शिष्टमंडळाने सदिच्छा भेट दिली. शिष्टमंडळात बोस्टन येथील नर्सिंग स्पेशालिस्ट मिस एस्टर गेरेन्डास, ग्रेस मे, जॅस्मिन सुंग व मेरी प्रभूदास यांचा समावेश होता. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार, डॉ. के.सी. मोरे, सी.एम.डी.आर. संचालक डॉ. प्रशांत ठाकरे व उपसंचालक डॉ. नीरज घनवटे उपस्थित होते. दौऱ्यात विदेशी तज्ज्ञांनी केंद्रातील अत्याधुनिक प्रयोगशाळा व संशोधन सुविधांची पाहणी करून प्राध्यापक आणि संशोधकांशी संवाद साधला. डॉ. प्रशांत ठाकरे यांनी केंद्रामार्फत सुरू असलेल्या विविध संशोधन प्रकल्पांची माहिती दिली. तसेच कोरोना महामारीच्या काळात सीएमडीआरने केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याचे सादरीकरण केले. कोविड-१९च्या उच्चांकाच्या काळात विद्यापीठाने बजावलेल्या धाडसी भूमिकेचे शिष्टमंडळाने कौतुक केले. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण असताना सीएमडीआरने उपलब्ध करून दिलेली आण्विक निदान चाचणी सुविधा प्रादेशिक नागरिकांसाठी अत्यंत प्रभावी ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

**तज्ज्ञांशी साधला संवाद**

चोवीस तास सुरू असलेल्या चाचणी प्रक्रिया, तांत्रिक अचूकता आणि कडक गुणवत्ता नियंत्रणाचेही त्यांनी विशेष कौतुक केले. यावेळी संशोधक पूजा मांडविया, रेणुका येंदे व विद्यार्थ्यांनीही तज्ज्ञांशी संवाद साधला. भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त संशोधन व सहकार्य वाढविण्यावर यावेळी चर्चा झाली.

# विदेशी संशोधकाची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाला भेट




अमरावती दि. ७ :– संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाला विदेशी संशोधकांनी भेट देऊन विभागातील संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधला. याप्रसंगी विदेशी संशोधक प्रसार माध्यम एक्सपर्ट जस्मिन सुंग (जर्मनी), मेडिकल एक्सपर्ट ग्रेस एम (युएसए), स्त्री अभ्यास एक्स्पर्ट इस्थरजी (बोस्टन अमेरिका) व वैज्ञानिक मर्षी प्रभुदास (सिंगापूर) यांनी विविध सामाजिक, आर्थिक आणि ग्रामीण प्रश्नांवर समाजशास्त्र विभागातील सर्व संशोधक व पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली.

यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार, डॉ.के.सी. मोरे उपस्थित होते. या भेटीदरम्यान विदेशी संशोधक एक्सपर्ट यांनी संशोधक विद्यार्थ्यांशी चर्चा करून त्यांच्या संशोधनाविषयी माहिती जाणून घेतली.

यावेळी आदिवासी कुटुंबाच्या समस्यां, शेतकऐयांची ग्रामीण व नागरी भागातील सामाजिक आणि आर्थिक समस्यां तसेच भारतीय समाजावर पडलेला आय.सी.टी व सोशल मीडियाचा प्रभाव आदी विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. या संवादामुळे समाजशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना नवीन संशोधन दृष्टिकोन मिळाला. विविध सामाजिक प्रश्नांवर संशोधनाच्या माध्यमातून उपाय शोधण्यासाठी अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संशोधकांच्या संवादाचे अधिक महत्त्व असून या भेटीमुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या संशोधन कार्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर नवीन दिशा मिळण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ.के.बी. नायक, अतिथींचा परिचर डॉ. वर्षा नाठार, सूत्रसंचालन प्रा.डॉ. रोहिणी देशमुख यांनी, तर आभार डॉ. रोहिणी देशमुख यांनी मानले. या भेटीदरम्यान विभागातील शिक्षक, संशोधक व विद्यार्थी उपस्थित होते.

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
हिंदुस्थान

# 'डॉकिंग वर्कबेंच' वेब अप्लिकेशनचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते थाटात लोकार्पण

## संगणकीय रसायनशास्त्रासाठी विद्यार्थ्यांच्या संशोधन कौशल्यातून साकारले नवे व्यासपीठ



अमरावती दि. ८ : शिक्षक दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात विकसित करण्यात आलेल्या 'डॉकिंग वर्कबेंच' या वेब अप्लिकेशनचे लोकार्पण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते त्यांच्या दालनात करण्यात आले. लोकार्पणप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे , कुलसचिव डॉ. अविनाश आसनारे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.आर.डी. सिकची, प्राचार्य डॉ. विजय नागरे, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर व सहाय्यक कुलसचिव श्री रविंद्र सयाम उपस्थित होते.

मॉलीक्युलर डॉकिंग आणि संगणकीय रसायनशास्त्र क्षेत्रातील विद्यार्थी-संशोधकांना अधिक सुलभ, गतिमान व परिणामकारक संशोधन करता यावे, या उद्देशाने हे वेब अप्लिकेशनचे व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे. हे नाविन्यपूर्ण वेब अप्लिकेशन रसायनशास्त्र विभागातील एम.एस्सी.चा विद्यार्थी वैभव पवार याने विभागातील प्राध्यापिका डॉ. मनिषा कोडापे यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित केले आहे. विषयज्ञान आणि संगणकीय कौशल्यांची सांगड घालत वैभव पवार या विद्यार्थ्याने संशोधनासाठी उपयुक्त ठरणारे हे डिजिटल व्यासपीठ साकारले आहे.

'डॉकिंग वर्कबेंच' हे आण्विक डॉकिंग प्रक्रियेतील विविध टप्पे सुलभ करणारे वेब-आधारित संशोधन आहे. याद्वारे विद्यार्थी व संशोधकांना आण्विक डॉकिंग, त्याचे विश्लेषण आणि संबंधित संगणकीय संशोधन प्रक्रियेचे नियोजन व अंमलबजावणी अधिक सहजपणे करता येणार आहे. तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून संशोधनातील वेळ व श्रमाची बचत करण्याच्या दृष्टीने हे अप्लिकेशन महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

लोकार्पणानंतर रसायनशास्त्र विभागात 'डॉकिंग वर्कबेंच' चे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे यांना यावेळी अप्लिकेशनची कार्यपद्धती, वैशिष्ट्ये आणि संशोधनातील संभाव्य उपयोग याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. याप्रसंगी डॉ.आर.डी. सातपुते, डॉ.ए.एस. वानखडे व प्रा. गजानन आमले उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना, तांत्रिक कौशल्ये आणि संशोधनाभिमुख उपक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या विद्यापीठाच्या धोरणाला 'डॉकिंग वर्कबेंच' मुळे नवी चालना मिळेल, तसेच मॉलीक्युलर डॉकिंग व संगणकीय रसायनशास्त्राच्या क्षेत्रात कार्यरत विद्यार्थी, संशोधक आणि अध्यापकांसाठी हे व्यासपीठ भविष्यात मोलाचे ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सुसंस्कृत आणि आनंदी जीवनासाठी संत साहित्याची गरज - डॉ. अलका इंदापवार






अमरावती, दि. ९ - मानवी जीवन जगत असताना अनेक अडचणी, संकटे आणि वैचारिक गोंधळ समोर येतात. अशा वेळी योग्य दिशा दाखवून जीवनाला अचूक मार्ग दाखवण्याचे काम केवळ संत साहित्य आणि थोर संतांचे विचारच करू शकतात, असे प्रतिपादन नागपूर येथील सुप्रसिद्ध वक्त्या डॉ. अलका इंदापवार यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालयात संपन्न झाली, त्याप्रसंगी 'श्री गुलाबराव महाराज एक अलौकिक संत' या विषयावर व्याख्यान देतांना त्या बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, श्री गणेशदास राठी छात्रालय समिती, अमरावतीचे अध्यक्ष श्री वसंतकुमारजी मालपाणी, माजी न्यायमूर्ती श्री सुदाम देशमुख, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, दानदात्यांचे प्रतिनिधी माजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.एम. भांगडिया व विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. इंदापवार पुढे म्हणाल्या, सामान्य माणसाला जीवन जगण्याचे अंतिम सत्य आणि आत्मिक सुख मिळवून देण्याकरिता संतांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे. दादासाहेब खापर्डे यांनी गुलाबराव महाराजांचा उल्लेख चालता-बोलता विश्वकोश असा केला होता, तर बापूजी अणे यांनी त्यांच्या ग्रंथांमधील अभ्यासाचे कौतुक केले होते. एवढेच नव्हे तर गानकोकिळा लता मंगेशकर यांनी देखील गुलाबराव महाराजांच्या चरित्राची प्रस्तावना वाचताना संतांचे अलौकिक कार्य पाहून आपण थक्क झाल्याचे म्हटले होते. तसेच, गोविंदगिरीजी महाराज यांनी गुलाबराव महाराजांना युगाचार्य असे संबोधत त्यांच्या ग्रंथसंपदेतील अकरा निकषांचा गौरव केला आहे.

माणूस अनेकदा भौतिक सुख-सुविधांच्या मागे धावताना स्वत:ला आणि आपल्या मूळ अस्तित्वाला विसरून जातो. आपल्याला हवे असलेले खरे सुख आपल्यातच असताना आपण ते जगात चुकीच्या ठिकाणी शोधत असतो. संत तुकाराम महाराजांनी देखील तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी असे सांगितले आहे. आद्य शंकराचार्य असोत, ज्ञानेश्वर महाराज असोत किंवा इतर संत परंपरा, या सर्व महापुरुषांनी कसलाही स्वार्थ न ठेवता केवळ सर्वसामान्य माणसाचे कल्याण व्हावे, मानवी समाज दु:खातून मुक्त व्हावा आणि सर्वांना भगवंताची प्राप्ती करता यावी, यासाठी अहोरात्र कष्ट घेतले. त्यांनी स्वत:च्या सुखाचा त्याग करून समाजाला योग्य दिशा दाखवली. म्हणूनच, आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण युगात संतांचे चरित्र ऐकणे, वाचणे आणि त्यांच्या विचारांचे आचरण करणे, ही काळाची गरज झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभली असून अमरावती जिल्ह्यमध्ये अनेक महान संत होऊन गेले. या संतांच्या विचारांचा व साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा, यासाठी अशाप्रकारच्या व्याख्यानाच्या आयोजनाचे उद्दिष्ट आहे. डॉ. अलका इंदापवार यांनी विषयाच्या अनुषंगाने गुलाबराव महाराजांच्या विविध ज्ञान क्षेत्रातील योगदानावर सविस्तर विवेचन केले. आळंदी व नागपूर येथे संत गुलाबराव महाराज साहित्य सम्मेलन संपन्न झाले होते, त्या सम्मेलनाला मला उपस्थित राहण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्यच समजतो.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संत गुलाबराव महाराज, माता स्वरस्वती व कै. गणेशदासजी राठी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी दानदात्यांचे प्रतिनिधी माजी प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ.व्ही.एल. भांगडिया, तर प्रास्ताविक विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. संचालन डॉ. राजू वाघ यांनी, तर आभार डॉ. सुनिल मावसकर यांनी केले. कार्यक्रमाला संत गुलाबराव महाराजांचे भाविक भक्त, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपली मातृभूमि

# गुलाबराव महाराजांचे कार्य आजही प्रेरणादायी




## डॉ.अलका इंदापवार यांचे प्रतिपादन

**आमा प्रतिनिधी/१० सप्टेंबर**

**अमरावती** : आजच्या धावपळीच्या आणि तणावाच्या जीवनात माणसाला योग्य दिशा देण्याचे काम संत साहित्य आणि संत विचार करू शकतात. संतांचे चरित्र आणि विचार समजून घेऊन ते आचरणात आणल्यास जीवनातील अडचणींना सामोरे जाण्याचे बळ मिळते. मनाला समाधान देण्यासोबत समाजहिताची जाणीव निर्माण होते, असे प्रतिपादन नागपूरच्या वक्त्या डॉ. अलका इंदापवार यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या जनसंपर्क विभाग आणि श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. 'संत गुलाबराव महाराज एक अलौकिक संत' या विषयावर डॉ. इंदापवार यांनी मार्गदर्शन केले. संत गुलाबराव महाराजांनी सामान्य माणसाला जीवनाचे सत्य आणि आत्मिक समाधान समजावून सांगण्यासाठी आपले आयुष्य समर्पित केले. दादासाहेब खापर्डे यांनी त्यांना 'चालता-फिरता विश्वकोश' म्हटले होते. बापूजी अणे यांनी त्यांच्या व्यापक अभ्यासाचे कौतुक केले होते. गायिका लता मंगेशकर यांच्यावरही त्यांच्या कार्याचा प्रभाव पडला होता. गोविंदगिरीजी महाराज यांनी गुलाबराव महाराजांना 'युगाचार्य' संबोधून त्यांच्या ग्रंथसंपदेचे महत्त्व अधोरेखित केले. माणूस भौतिक सुखाच्या मागे धावताना खरे समाधान विसरतो. संत तुकारामांचा विचार याच वास्तवाची जाणीव करून देतो. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध संत परंपरेचा उल्लेख केला.

कार्यक्रमाला वसंतकुमार मालपाणी, माजी न्यायमूर्ती सुदाम देशमुख, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. अरविंद देशमुख, प्राचार्य डॉ. व्ही. एल. भांगडिया आणि डॉ. विलास नांदूरकर यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सी.एम.डी.आर. ला विदेशी शिष्टमंडळाची भेट

## कोरोना काळातील उत्कृष्ट कार्याचा गौरव




अमरावती, दि. ७ -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस अँड रिसर्च (सी.एम.डी.आर.) ला विदेशी संशोधन तज्ज्ञ आणि आरोग्यशास्त्रज्ञांच्या एका प्रतिष्ठित शिष्टमंडळाने सदिच्छा भेट दिली. या शिष्टमंडळामध्ये मिस एस्टर गेरेन्डास (नर्सिंग स्पेशालिस्ट, बोस्टन), ग्रेस मे (एमडी ट्यूटर), जॅस्मिन सुंग (सिल्व्हर स्प्रिंग एमडी) आणि मेरी प्रभूदास (सिल्व्हर स्प्रिंग एमडी) यांचा समावेश होता. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वर्षा नाठार, डॉ. के.सी. मोरे, सी.एम.डी.आर. चे संचालक डॉ. प्रशांत ठाकरे आणि उपसंचालक डॉ. नीरज घनवटे उपस्थित होते.

**अत्याधुनिक सुविधांची पाहणी व उच्चस्तरीय चर्चा**

दौऱ्यादरम्यान पाहुण्यांनी विद्यापीठाच्या अत्याधुनिक सुविधांची पाहणी करुन प्राध्यापक व संशोधकांशी संवाद साधला. यावेळी संचालक डॉ. प्रशांत ठाकरे यांनी सी.एम.डी.आर. केंद्राच्यावतीने सुरु असलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. तसेच कोरोना महामारीच्या काळात प्रयोगशाळेने समाजाला सेवा देवून कशी मोलाची कामगिरी बजावली, याचे सादरीकरण केले.

प्रतिदिन अखबार

# सुसंस्कृत और सुखमय जीवन के लिए संत साहित्य की आवश्यकता

## डॉ. अलका इंदापवार का प्रतिपादन, श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला




**प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार**

**अमरावती, 10 सितंबर-** संगाबा अमरावती विद्यापीठ के जनसंपर्क विभाग और के.एल. लाहोटी मवि. के संयुक्त तत्वावधान में प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज व्याख्यानमाला महाविद्यालय में संपन्न हुई. इस प्रसंग पर अपने संबोधन में नागपुर की प्रसिद्ध वक्त्या डॉ. अलका इंदापवार ने कहा कि जीवन को अचूक मार्ग दिखाने का काम केवल संत साहित्य और महान संतों के विचार ही कर सकते हैं. उन्होंने 'श्री गुलाबराव महाराज एक अलौकिक संत' नामक विषय पर व्याख्यान देते हुए कहा कि सुसंस्कृत और सुखमय जीवन के लिए संत साहित्य की आवश्यकता होती है. कार्यक्रम की अध्यक्षता विद्यापीठ के प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे ने की. प्रमुख अतिथियों में गणेशदास राठी छात्रालय समिति के अध्यक्ष वसंत



मालपाणी, पूर्व न्यायमूर्ति सुदाम देशमुख, डॉ. श्रीकांत पाटिल, दानदाता के प्रतिनिधि पूर्व प्राचार्य डॉ.अरविंद देशमुख, मवि. के प्राचार्य डॉ. व्ही.एम. भांगड़िया, पीआरओ डॉ.विलास नांदुरकर आदि मान्यवर उपस्थित थे.अपने अध्यक्षीय संबोधन में प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे ने कहा कि, महाराष्ट्र को बड़ी संत परंपरा प्राप्त हुई है तथा अमरावती जिले में अनेक महान संत हुए. ऐसे में इन संतों के विचारों व साहित्यों का अभ्यास विद्यार्थियों को करना चाहिए, इसके लिए इस प्रकार के व्याख्यान का आयोजन किया जाता है. राष्ट्रगीत और विद्यापीठ गीत के साथ कार्यक्रम प्रारंभ हुआ. संत गुलाबराव महाराज, मां सरस्वती और स्व. गणेशदास राठी के तैलचित्रों का पूजन और दीप प्रज्वलन मान्यवरों के हस्ते किया गया.

स्वागत सत्कार की औपचारिकता के बाद उपस्थित अतिथियों ने अपने समयोचित विचार व्यक्त किए. संचालन डॉ. राजू वाघ ने तथा आभार प्रदर्शन डॉ. सुनील मावस्कर ने किया. कार्यक्रम में संत गुलाबराव महाराज के भक्त, सभी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी और नागरिक बड़ी संख्या में उपस्थित थे.

सकाळ

# पाली साहित्य संमेलन अमरावतीत आयोजित करण्याचा मानस

## संत गाडगेबाबा विद्यापिठात पाली भाषा व अनागारिक धम्मपाल यांच्या कार्याचा जागर

**■ सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. १८ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पाली आणि बुद्धिझम विभागाच्या वतीने विश्व पाली भाषा गौरव दिवस तसेच अनागारिक धम्मपाल जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

विश्व पाली भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून प्रा. डॉ. टी. बी. रामटेके यांनी पाली भाषेत प्रभावी प्रास्ताविक केले. यावेळी भिक्खू अमरावती सीलवंसलंकार, एम.ए. भाग-२ चे विद्यार्थी देविदास मेटांगे तसेच प्राध्यापकवृंदांनी पाली भाषेचे ऐतिहासिक, धार्मिक, साहित्यिक



**अमरावती :** विद्यापिठात पाली भाषा गौरव दिन व अनागारिक धम्मपाल जयंतीच्या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर.

व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट केले. तसेच अनागारिक धम्मपाल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत बौद्ध धम्माच्या जागतिक प्रसारातील त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डी. व्ही. रोकडे यांनी इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनांचा संदर्भ देत वर्तमान पिढीने आपल्या वैचारिक आणि सांस्कृतिक वारशाशी बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाली भाषा व साहित्याच्या व्यापक प्रसारासाठी अमरावती येथे पाली साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मानस यावेळी व्यक्त करण्यात आला. या उपक्रमाला लवकरच प्रत्यक्ष स्वरूप देण्याचा निर्धारही करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रेखा वानखडे (पर्वतकर) होत्या. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून पाली भाषा आणि बुद्धिझमच्या अभ्यासाला अधिक व्यापक दिशा देण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.ए. भाग-२ च्या विद्यार्थिनी डॉ. विजया मुळे यांनी केले, तर एम.ए. भाग-१ च्या विद्यार्थी डॉ. कपिल पाटील आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एम.ए. भाग-१ व भाग-२ विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीने विशेष परिश्रम घेतले. अध्यक्ष सुधाकर पाटील, अशोक भोरे, बाबुलाल सिरसाट, शिवदास अढाऊ, सुनील वंजारी आणि नीलेश जवंजाळ यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

हिंदुस्थान

# विद्यापीठाची कवी केशवसुत काव्यस्पर्धा उत्साहात संपन्न

## उर्वी खडके प्रथम, आत्मजा मोरे द्वितीय तर प्रणव कोरे तृतीय



अमरावती दि. १७ : सामाजिक वास्तव, मानवी वेदना, परिवर्तनाची आस आणि समकालीन प्रश्नांचे आत्मभान व्यक्त करणाऱ्या प्रभावी काव्यसादरीकरणामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागातर्फे आयोजित 'कवी केशवसुत काव्यस्पर्धे'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विश्वबंधुत्व दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात आयोजित या स्पर्धेत तरुण कवींनी विविध विषयांवरील कविता सादर करुन रसिकांची दाद मिळविली. टाळ्यांचा कडकडाट; उत्स्फूर्त प्रतिसाद आणि तरुणाईच्या उत्साहामुळे सभागृह दिवसभर काव्यमय झाले होते.

स्पर्धेत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथील उर्वी हेमंत खडके हिने प्रथम क्रमांक पटकावला. श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला येथील आत्मजा सुरेश मोरे हिने द्वितीय, तर हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथील प्रणव कोरे याने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्यांना अनुक्रमे रु.३०००, रु.२००० आणि रु.१५०० रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालये व शैक्षणिक विभागांतील ३३ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. स्पर्धेचे हे नववे वर्ष होते.

या स्पर्धेतील कवितांमधून मानवी नातेसंबंध, वैयक्तिक अनुभव, सामाजिक विषमता, मानवी सुखदु:ख, स्त्रीजीवन, पर्यावरण, बदलती जीवनमूल्ये आणि समकालीन सामाजिक प्रश्नांना सर्जनशील अभिव्यक्ती प्राप्त झाली. आशयातील वैविध्य, भाषेचा नेमका वापर, काव्यात्मता, कल्पनाशक्ती आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे स्पर्धेला विशेष रंगत आली.

अध्यक्षीय भाषणात मराठी विभागप्रमुख तथा मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांनी कविता ही माणसाच्या अंतःकरणाला शब्दरूप देणारी सर्जनशील भाषा असल्याचे सांगितले. मराठी कवितेची समृद्ध परंपरा, आशयवैविध्य आणि अभिव्यक्तीचे विविध आकृतिबंध विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यापक अवकाश देतात. विद्यार्थ्यांना या परंपरेचा परिचय व्हावा, कवितेविषयी आस्था निर्माण व्हावी आणि त्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काव्यवाचन व काव्यलेखनामुळे भाषिक जाणिवा, संवेदनशीलता आणि चिकित्सक दृष्टी विकसित होते, असेही त्यांनी नमूद केले.

उद्घाटनप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कविता ही मानवी अनुभव, भावना आणि विचारांना कलात्मक अभिव्यक्ती देणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. अनुभवाला शब्दरूप मिळाल्याने त्याला व्यापक अर्थ प्राप्त होतो आणि सभोवतालच्या जगाशी संवेदनशील संवाद साधता येतो. विद्यार्थ्यांनी अशा सर्जनशील उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपल्या अभिव्यक्तीला आकार द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

परीक्षक तथा श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे यांनी विचार आणि भावना यांच्या सुंदर मिलाफातून कवितेला काव्यात्मक सौंदर्य प्राप्त होते, असे सांगितले. आशय-अभिव्यक्तीचा समतोल, भाषेचा नेमका वापर, प्रतिमा, लय, भावविश्व आणि सादरीकरण हे कवितेचे महत्वाचे घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रसिद्ध कवी व गझलकार तथा परीक्षक अनंत नांदुरकर यांनी काव्यनिर्मिती ही संवेदनशीलतेची साधना असल्याचे सांगितले. तरुणांच्या कवितेत वैयक्तिक भावविश्वासोबत सामाजिक वास्तवाचे भान आणि मानवी वेदनांविषयीची संवेदनशीलता प्रभावीपणे व्यक्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे आणि अनंत नांदुरकर यांनी आशय, भाषिक सौंदर्य, काव्यात्मता, कल्पनाशक्ती, भावनिक प्रभाव, सादरीकरण आणि सामाजिक आशय या निकषांच्या आधारे कवितांचे परीक्षण केले. दिवसभर रंगलेल्या या काव्यमैफलीचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. डॉ. हेमंत खडके यांनी केले. त्यांच्या उत्साही आणि ओघवत्या निवेदनामुळे स्पर्धेतील प्रत्येक टप्पा अधिक रंगतदार झाला.

उद्घाटन सत्र व बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. अभिजित इंगळे यांनी केले. उद्घाटन सत्राचे आभार प्रा. अंकिता जैन, तर बक्षीस वितरण सत्राचे आभार स्पर्धेचे समन्वयक प्रा.डॉ. प्रणव कोलते यांनी मानले. स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रा.डॉ. मोना चिमोटे, प्रा.डॉ. माधव पुटवाड, प्रा. डॉ. प्रणव कोलते तसेच पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी सक्रिय परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

# उर्वी प्रथम, आत्मजा द्वितीय तर प्रणव तृतीय

## विद्यापीठाची कवी केशवसूत काव्य स्पर्धा उत्साहात

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**अमरावती :** सामाजिक वास्तव, मानवी वेदना, परिवर्तनाची आस आणि समकालीन प्रश्नांचे आत्मभान व्यक्त करणाऱ्या प्रभावी काव्य सादरीकरणामुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागातर्फे आयोजित कवी केशवसूत काव्य स्पर्धेला प्रतिसाद मिळाला.

विश्वबंधुत्वदिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात आयोजित या स्पर्धेत तरुण कवींनी विविध विषयांवरील कविता सादर करून रसिकांची दाद मिळविली. टाळ्यांचा कडकडाट, प्रतिसाद आणि तरुणाईच्या उत्साहामुळे सभागृह दिवसभर काव्यमय झाले होते. स्पर्धेत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथील उर्वी हेमंत खडके हिने प्रथम, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला येथील आत्मजा सुरेश मोरे हिने द्वितीय तर हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथील प्रणव कोरे याने तृतीय क्रमांक पटकाविला. विजेत्यांना रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. ३३ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील कवितांमधून मानवी नातेसंबंध, वैयक्तिक अनुभव, सामाजिक विषमता, मानवी सुखदुःख, स्त्री जीवन, पर्यावरण, बदलती जीवनमूल्ये आणि समकालीन सामाजिक प्रश्नांना सर्जनशील अभिव्यक्ती प्राप्त झाली. स्पर्धेच्या उद्घाटकीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मोना चिमोटे तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उपस्थित होते. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे, अनंत नांदूरकर यांची उपस्थिती होती.

रोज सकाळी प्रकाशित होणारे
अमरावती इव्हिनिंग

## विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागात अभियांत्रिकी दिन उत्साहात साजरा



अमरावती - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अभियंता दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक, तर प्रमुख अतिथी म्हणून संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.मो. अतिक उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ.मो. अतिक यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याकरिता दहा कलमी प्रोग्राम व नियोजनाचे महत्व विषद केले. अध्यक्षीय भाषणातून केमिकल टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिल नाईक म्हणाले, मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी केलेली कामे आजही सुस्थितीत कार्यरत असून आधुनिक अभियांत्रिकी क्षेत्रातील नवोन्मेष, नीतिमत्ता व शाश्वत विकासाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. अभियांत्रिकी ही केवळ यंत्रांची भाषा नसून समाजाचे भविष्य घडविण्याची जबाबदारी असल्याचेही ते म्हणाले. अभियंतानी देशाच्या विकासात केलेल्या कार्याचे सउदाहरण महत्व विषद करुन मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जीवनकार्यावर त्यांनी याप्रसंगी प्रकाश टाकला.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर विश्वेश्वरय्या व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश येलने व कु. मुगुल यांनी, तर आभार संकेत वारे याने मानले. विद्यार्थ्यांच्या आयोजन समितीने प्रा. यश तांबे यांच्या नियंत्रणात उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. कार्यक्रमाला विभागातील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



## प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव रवींद्र सयाम आदी उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

## विद्यार्थ्यांनी घेतला शिक्षकांच्या ऋणाचा जागर; सकारात्मक जीवनदृष्टीचा मंत्र

### रसायनशास्त्र विभागात शिक्षक दिन उत्साहात; ध्येय निश्चित करण्याचे मार्गदर्शन

प्रतिनिधी | अमरावती



कार्यक्रमात उपस्थित रसायनशास्त्र विभागातील शिक्षकवृंद आणि विद्यार्थी.

शिक्षक दिनानिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत शिक्षकांप्रती कृतज्ञता, आदर आणि ऋण व्यक्त केले. शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचे कलागुण आणि जीवनातील संघर्षातून सकारात्मक वाटचाल करण्याचा संदेश देणारा हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमातून शिक्षक-विद्यार्थी नात्यातील स्नेह आणि आपुलकीचा सुंदर अनुभव पाहायला मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. आर. एस. सातपुते होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. ए. एस. वानखडे उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे, अधिसभा सदस्य डॉ. जागृती बारब्दे, व्य. प. सदस्य डॉ. मनिषा कोडापे, रसायनशास्त्र क्लबच्या डॉ. यास्मिन शेख, प्रा. गजानन आमले, प्रा. पायल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. माता सरस्वती, संत गाडगेबाबा आणि महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. प्रा. ए. एस. वानखडे यांनी विद्यार्थ्यांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा संदेश दिला. जीवनातील संघर्षांचा धैर्याने सामना करून ध्येय निश्चित करावे आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. भविष्यात उपलब्ध होणाऱ्या संधींचा योग्य उपयोग करून स्वतःची वाटचाल घडवावी, असे त्यांनी सांगितले. विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे आणि व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या कलागुणांना योग्य दिशा देऊन त्यांचा सकारात्मक उपयोग करावा. स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवत आपले विश्व अधिक सकारात्मक व समृद्ध करण्याचा प्रयत्न करावा, असा सल्ला त्यांनी दिला. अध्यक्षीय भाषणात प्रा. आर. एस. सातपुते यांनी शिक्षक, विद्यार्थी, संस्कार, शिक्षण आणि जीवनातील संघर्ष या विविध पैलूंची सांगड घालत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

दैनिक भास्कर

# विवि के रासायनिक प्रौद्योगिकी विभाग में मनाया गया इंजीनियर्स-डे



## ▪ अभियंता दिवस पर विश्वेश्वरैया के कार्यों को किया याद

**भास्कर डेस्क | अमरावती.** संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के रासायनिक प्रौद्योगिकी विभाग में भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या की स्मृति में अभियंता दिवस उत्साहपूर्वक मनाया गया। विभागाध्यक्ष डॉ. अनिल नाईक की अध्यक्षता तथा संगणकशास्त्र विभागाध्यक्ष डॉ. मो. अतिक की प्रमुख उपस्थिति में कार्यक्रम हुआ। डॉ. अतिक ने विद्यार्थियों को सफलता के लिए दस सूत्रीय कार्यक्रम और नियोजन का महत्व बताया। डॉ. नाईक ने विश्वेश्वरय्या के योगदान को याद करते हुए कहा कि अभियंत्रिकी केवल यंत्रों का ज्ञान नहीं, बल्कि समाज का भविष्य गढ़ने की जिम्मेदारी भी है। इस अवसर पर विश्वेश्वरय्या व संत गाडगे बाबा की प्रतिमाओं का पूजन किया गया। शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित रहे।

रोज सकाळी प्रकाशित होणारे
अमरावती इव्हिनिंग

# विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे जयंती साजरी



**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव श्री रविंद्र सयाम तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व प्रबोधनकार ठाकरे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

**प्रसाराला नवी दिशा • सांस्कृतिक वारशाला व्यापक व्यासपीठ देण्याचा मानस**

# ज्ञान, धम्म आणि साहित्य संगम; पाली, बुद्धिझम विभागाचे संमेलन

प्रतिनिधी | अमरावती

पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर पाली भाषा व साहित्याच्या प्रसाराला नवी दिशा देण्यासाठी पाली साहित्य संमेलन आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पाली आणि बुद्धिझम विभागाच्या वतीने विश्व पाली भाषा गौरव दिन व अनागारिक धम्मपाल जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात हा मानस व्यक्त करण्यात आला. पाली भाषा, बौद्ध साहित्याची समृद्ध परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांना व्यापक व्यासपीठ देण्यासाठी पुढाकार घेण्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रेखा वानखडे होत्या. तर प्रमुख अतिथि म्हणून डी. व्ही. रोकडे यांची उपस्थिती होती. यादरम्यान डी. व्ही. रोकडे यांनी मार्गदर्शन करताना इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनांचा संदर्भ देत वर्तमान पिढीने आपल्या वैचारिक व सांस्कृतिक वारशाशी बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. पाली भाषेच्या अभ्यासासोबतच तिच्याशी संबंधित साहित्य, इतिहास आणि सांस्कृतिक परंपरेच्या जतनाची गरजही त्यांनी व्यक्त करण्यात आली. तसेच प्रा. डॉ. वानखडे यांनी कार्यक्रमाचा आढावा घेत पाली भाषा आणि बुद्धिझमच्या अभ्यासाला अधिक व्यापक दिशा देण्याची गरज व्यक्त केली.


पाली आणि बुद्धिझम विभागाचे कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व मान्यवर.

पाली साहित्य संमेलनाचा प्रस्ताव प्रत्यक्षात आणण्यासाठी लवकरच पुढाकार घेण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. पाली भाषा व साहित्याचे अभ्यासक, विद्यार्थी तसेच या विषयात रस असणाऱ्यांना एकत्र आणण्यासाठी संमेलनासारख्या उपक्रमातून व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते, अशी भूमिका मांडण्यात आली. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या साहित्यिक व सांस्कृतिक वारशाच्या प्रसारासाठी अमरावतीतून अशा प्रकारचा उपक्रम राबवण्याचा संकल्प या कार्यक्रमातून पुढे आणण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी एम.ए. भाग-१ व भाग-२ विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीने परिश्रम घेतले. अध्यक्ष सुधाकर पाटील, अशोक भोरे, बाबुलाल सिरसाट, शिवदास अढाऊ, सुनील वंजारी व निलेश जवंजाळ यांनी आयोजनात भूमिका बजावली. पाली भाषेचा समृद्ध वारसा, बौद्ध साहित्याची परंपरा आणि अनागारिक धम्मपाल यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अमरावतीतून विविध उपक्रम राबवण्याचा संकल्प कार्यक्रमातून देण्यात आला आहे.

## अनागारिक धम्मपाल यांना अभिवादन

विद्यापीठाच्या प्रादेशिक कला विभागाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांना वंदन, त्रिशरण व पंचशील ग्रहण करून झाली. विश्व पाली भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून प्रा. डॉ. टी. बी. रामटेके यांनी पाली भाषेत प्रास्ताविक केले. अनागारिक धम्मपाल यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. बौद्ध धम्माच्या जागतिक प्रसारासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण करताना त्यांचे विचार व कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज व्यक्त करण्यात आली. भिक्खू अमरावती सीलवंसलंकार, एम.ए. भाग-२चे विद्यार्थी देविदास मेटांगे तसेच प्राध्यापकवृंदांनी पाली भाषेचे ऐतिहासिक, धार्मिक, साहित्यिक व सांस्कृतिक महत्त्व यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला.

यावेळी सूत्रसंचालन विद्यार्थिनी डॉ. विजया मुळे यांनी केले, तर विद्यार्थी डॉ. कपिल पाटील यांनी आभार मानले.

मराठी दैनिक वृत्त केसरी

**तिसरे महानुभाव साहित्य संमेलन**

# महानुभाव साहित्याचे जतन करणे मराठी भाषिकांचे कर्तव्य

**उद्घाटक डॉ महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती, १९ सप्टेंबर : महानुभाव साहित्यातून आम्हाला मूल्यात्मक शिकवण व नैतिक आचरण मिळत राहते. महानुभाव साहित्याचे चांगल्या रीतीने जतन करणे सर्व मराठी भाषिकांची सामूहिक जबाबदारी आहे असे उद्बोधन तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्घाटक प्र कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले.

संमेलनाध्यक्ष डॉ. गिरीश गांधी अध्यक्ष विदर्भ साहित्य संघ नागपूर म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून, डॉ. महंत सोनपेठकर समन्वयक महानुभाव अध्यासन केंद्र, डॉ अविनाश आवलगावकर कुलगुरू मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर तालुका मोर्शी, डॉ आराधना वैद्य अध्यक्ष भारतीय विद्या मंदिर अमरावती, न्यायमूर्ती डॉ. कीर्ती कुलकर्णी, डॉ. भैय्यासाहेब मेटकर, सुभाष पावडे, डॉ संतोष आगरकर सत्कारमूर्ती हर्षी कर बाबा शेवलीकर, विजयराज पंजाबी आदी उपस्थित होते. महानुभाव पंथीय साहित्य ग्रंथदिंडी श्रीकृष्ण मंदिरापासून परशुराम पॅलेस या संमेलन स्थळापर्यंत काढण्यात आली. यात भारतीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व महानुभाव पंथीय तसेच साहित्य प्रेमी मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. साहित्य





संमेलनाचे स्वागत पर प्रस्तावित डॉ. संतोष आगरकर प्राचार्य भारतीय महाविद्यालय मोर्शी यांनी केले. याप्रसंगी डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. आराधना वैद्य न्यायमूर्ती कीर्ती कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. संमेलनाध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी आजचा माणूस द्वीप्रतिमेत जगत असल्यामुळे साहित्यातून समाज निर्मिती होत नसल्याची खंत व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले. दुपारच्या सत्रात महानुभाव पंथाचे वर्तमानकालीन सृजनात्मक साहित्य या परिसंवादाचे अध्यक्षस्थानी गोपीराज बाबा शास्त्री होते. तर डॉ. भारतभूषणशास्त्री जामोदेकर, डॉ अण्णा वैद्य प्रा चक्रधर कोठी यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ अर्चना शिरस्कार यांनी केले. कवि समेलनाने या साहित्य संमेलनाची रंगत आणली. संमेलनाचे आयोजन भारतीय महाविद्यालय मोर्शी, श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती मोर्शी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, विदर्भ साहित्य संघ रिद्धपुर, महानुभाव अध्यासन केंद्र अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

पुण्य नगरी

# महानुभाव साहित्याचे जतन करणे सर्व मराठी भाषिकांचे कर्तव्य

**प्र. कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांचे प्रतिपादन**

**तिसरे महानुभाव साहित्य संमेलन**



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती :** महानुभाव साहित्यातून आम्हाला मूल्यात्मक शिकवण व नैतिक आचरण मिळत राहते. महानुभाव साहित्याचे जतन करणे, सर्व मराठी भाषिकांची सामूहिक जबाबदारी आहे, असे उद्बोधन तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचे उद्घाटक विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले.

या कार्यक्रमाला संमेलनाध्यक्ष म्हणून विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. महंत सोनपेठकर, मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. आराधना वैद्य, न्यायमूर्ती डॉ.कीर्ती कुलकर्णी, डॉ.भैय्यासाहेब मेटकर, सुभाष पावडे, डॉ संतोष आगरकर, हर्षीकर बाबा शेवलीकर, विजयराज पंजाबी उपस्थित होते. यावेळी सकाळी महानुभाव पंथीय साहित्य ग्रंथदिंडी श्रीकृष्ण मंदिरापासून परशुराम पॅलेस या संमेलन स्थळापर्यंत काढण्यात आली. यात भारतीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व महानुभाव पंथीय तसेच साहित्य प्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. साहित्य संमेलनाचे स्वागत प्रस्तावित डॉ. संतोष आगरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले. दुपारच्या सत्रात महानुभाव पंथाचे वर्तमानकालीन सृजनात्मक साहित्य या परिसंवादाचे अध्यक्षस्थानी गोपीराज बाबा शास्त्री होते तर डॉ.भारतभूषणशास्त्री जामोदेकर, डॉ अण्णा वैद्य, प्रा चक्रधर कोठी यांनी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अर्चना शिरस्कार यांनी केले. यावेळी कवि संमेलनाने या साहित्य संमेलनाची रंगत आणली.

लोकमत

# महानुभाव साहित्यातून साध्या राहणीमानाची पदोपदी मांडणी

नरेन्द्र निकम
लोकमत न्यूज नेटवर्क

**मोर्शी :** महानुभाव साहित्यातून साध्या राहणीमानाची पदोपदी मांडणी केली आहे. माणसाने नेहमी जमिनीवर राहावे, जमिनीवरच चालावे ही भावना महानुभाव साहित्याच्या एकएका पंक्तीतून व्यक्त केलेली आहे, असे मत मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर यांनी तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनात प्रकट मुलाखतीच्या वेळी सांगितले.

**डॉ. अविनाश आवलगावकर : तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनात प्रकट मुलाखत**

मोर्शी येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे महानुभाव अध्यासन केंद्र, श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी सोहळा समिती, भारतीय महाविद्यालय, विदर्भ साहित्य संघ शाखा (रिद्धपूर) यांच्या संयुक्त विद्यमाने द्विदिवसीय तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनात कुलगुरू डॉ. आवलगावकर यांची प्रकट मुलाखत मराठी भाषा विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी रविवारी घेतली. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या चौथ्या सत्रात 'महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभावपंथाचे योगदान' या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. कोमल ठाकरे यांनी भूषविले. यावेळी प्रा. संदीप तडस, डॉ. मीनाक्षी भांदक्कर, डॉ. कल्पना मेहरे यांनी सहभाग घेतला. पाचव्या सत्रात 'महानुभाव दर्शनशास्त्र : स्वरूप व वैशिष्ट्ये' या परिसंवादाचे अध्यक्षस्थान आचार्य महंत अष्टूरकर बाबा यांनी भूषविले. महंत श्रीसारंगधरबाबा शास्त्री पुसदेकर, नितीन बांधकर हे सहभागी होते. संचालन प्रा. सीमा मेटकर यांनी केले.



तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनात उपस्थित मान्यवर

संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षपद आचार्य पाचराऊतबाबा (रिद्धपूर) यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर बाबा, व्यवस्थापन समिती सदस्य भय्यासाहेब मेटकर, व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र कडू, सिनेट सदस्य ॲड. अमोल ठाकरे, परसराज कारंजेकर, भारतीय महाविद्यालय मोर्शीचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर, डॉ. अण्णा वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते. संचालन डॉ. संदीप जुनघरे व प्रास्ताविक डॉ. सोनपेठकर बाबा यांनी केले. आयोजनासाठी श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समितीचे सदस्य, साहित्यिकांचे सहकार्य लाभले.

हिंदुस्थान

# माणसाने नेहमी जमिनीवर रहावे : डॉ. अविनाश आवलगावकर

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महानुभाव अध्यासन केंद्राचा उपक्रम



अमरावती दि. २१ : माणसाने नेहमी जमिनीवर राहावं, जमिनीवरच चालावं, ही भावना महानुभाव साहित्याच्या एकेका पंक्तीतून अतिशय सुंदर पध्दतीने व्यक्त केलेली आहे, असे रिध्दपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी तिस-या महानुभाव साहित्य संमेलनात प्रकट मुलाखती वेळी सांगितले. तुम्ही ज्या पातळीवर मला पाहता तिथे पोहोचायला मला पुन्हा प्रयत्न करावे लागेल असा नम्रभाव संदेश त्यांनी उपस्थिताना दिला. त्यांची प्रकट मुलाखत मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे यांनी घेतली.

महानुभाव अध्यासन केंद्र, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी सोहळा समिती मोर्शी, भारतीय महाविद्यालय मोर्शी, विदर्भ साहित्य संघ शाखा रिध्दपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तिस-या महानुभाव साहित्य संमेलनाच्या दुस-या दिवशी चौथ्या सत्रात महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. कोमल ठाकरे यांनी भूषविले. यावेळी प्रा. संदीप तडस, डॉ. मीनाक्षी भांदककर, डॉ. कल्पना मेहरे यांनी सहभाग घेतला.

पाचव्या सत्रात महानुभाव दर्शनशास्त्र : सरुप व वैशिष्ट्ये या परिसंवादाचे अध्यक्षस्थान आचार्य महंत अष्टूरकर बाबा यांनी भूषविले. महंत श्रीसारंगधरबाबा शास्त्री पुसदेकर, नितीन बांधकर हे सहभागी झाले होते. सूत्रसंचलन प्रा. सीमा मेटकर यांनी केले.

संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आचार्य श्री पाचराऊतबाबा, रिध्दपूर यांनी भूषविले. तर प्रमुख अतिथी म्हणून, डॉ. महंत सोनपेठकर बाबा, समन्वयक महानुभाव अध्यासन केंद्र, संत गाडगेबाबा विद्यापीठ, भैय्यासाहेब मेटकर, व्यवस्थापन समिती सदस्य, डॉ. कोमल ठाकरे, अधिष्ठाता मराठी भाषा विद्यापीठ, डॉ. रविंद्र कडु, सदस्य व्यवस्थापन परिषद, ॲड. अमोल ठाकरे, अधिसभा सदस्य, परसराज कारंजेकर, डॉ. संतोष आगरकर, प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, डॉ. अण्णा वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सोनपेठेकर बाबा यांनी, सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले. कार्यक्रमासाठी श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती सदस्य, भारतीय महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी तसेच साहित्यिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हिंदुस्थान

# विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात फिजिक्स क्लबचे उद्‌घाटन



अमरावती दि. २१ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात 'फिजिक्स क्लब २०२६-२७' चा उद्घाटन सोहळा नुकताच उत्साहात संपन्न झाला. यावेळी आंतरमहाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. ए. वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून उपयोजित परमाणू व विद्युत विभागप्रमुख डॉ. सुजाता काळे, प्रमुख वक्ते म्हणून आय.आय. एल. संचालक डॉ. स्वाती शेरेकर, डॉ. जी. जी. मुळे, प्रा. आर. ए. पारखी, प्रा. वैदेही बोंबटकर, प्रा. गौरव सातव, प्रा. विजय लोडे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. सुजाता काळे यांनी मार्गदर्शन करताना कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय) चे महत्त्व विषद केले. प्रमुख वक्ते डॉ. स्वाती शेरेकर यांनी फिजिक्स क्लबचे महत्त्व, क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होणा-या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. एस. वाघुळे यांनी विद्यापीठासह भौतिकशास्त्र विषयाचे कसे महत्त्व आहे याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी प्रा. वैदेही बोंबटकर यांनी फिजिक्स क्लबच्या पदाधिका-यांची घोषणा केली. क्लबच्या अध्यक्षपदी द्वितीय वर्षाची कु. आरती पवार हिची निवड करण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. गौरव सातव यांनी केले.

आंतर महाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

आंतर महाविद्यालयीन प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांचे भौतिकशास्त्र विषयातील ज्ञान, आकलन आणि तत्परतेची कसोटी घेण्यात आली. स्पर्धेचे सूत्रसंचालन सार्थक गाडगे यांनी केले. या स्पर्धेत शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीच्या संघाने प्रथम, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय संघाने द्वितीय, तर विद्याभारती महाविद्यालय संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

प्रा. राज पारखी आणि संशोधक विद्यार्थिनी प्रियंका गोळे यांनी प्रश्नमंजूषा स्पर्धेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगतांना अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचा विषयज्ञानासोबतच आकलन, तर्कशक्ती आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. विजेत्या संघांना पारितोषिकांचे याप्रसंगी वितरण करण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे आभार संकेत गुजर यांनी मानले.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सूत्रसंचालन चंदन बावनकर व कोमल तायडे यांनी केले. अतिथी व वक्त्यांचा परिचय डॉ. जी. जी. मुळे यांनी करून दिला. कार्यक्रमाला विभागातील संशोधक विद्यार्थी अक्षय बांगर व संशोधक विद्यार्थिनी प्रियंका गोळे, फिजिक्स क्लबचे पदाधिकारी तसेच विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी व स्पर्धक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागातील प्राध्यापकवृंद, फिजिक्स क्लबचे पदाधिकारी, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

City Pulse

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात दीक्षारंभ कार्यक्रम

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या केंद्रीय प्रवेश समितीच्या वतीने 'दीक्षारंभ २०२६' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते तर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, रिलायन्स फाउंडेशनच्या सीएसआर समन्वयक पायल भैसारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखाधिकारी पुष्कर देशपांडे, आंतर विद्याशाखीय अभ्यास शाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. कपिल कांबळे आदी उपस्थित होते. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांच्या हस्ते कर्मयोगी श्रीसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ. कपिल कांबळे, संचालन प्रा. डॉ. प्रणव कोलते तर आभार प्रदर्शन डॉ. कमलाकर मोरे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विभागप्रमुख, शिक्षक, कर्मचारी व नवीन प्रवेशित विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मराठी दैनिक
वृत्त केसरी

### राष्ट्रीय सेवा योजनेचे निवड चाचणी शिबीर

# रासेयो स्वयंसेवकांनी विद्यापीठाचे नाव उंचावले

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे आवाहन



प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती, २२ सप्टेंबर : विद्यापीठाच्या रासेयो स्वयंसेवकांनी राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करुन विद्यापीठाच्या नावलौकीकात भर घातली असून निवड झालेल्या रासेयो स्वयंसेवकांनी यापुढेही असाच नावलौकीक मिळवावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबीराचे उद्घाटन संपन्न झाले. त्याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. उद्घाटक म्हणून एनसीसी मुख्यालय, अमरावती येथील ८ महाराष्ट्र बटालियनचे ए.ओ. लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, अमरावतीशहररासेयोजिल्हासमन्वयक डॉ. विशाल गजभिये, ग्रामीण समन्वयक डॉ. विकास देशमुख, यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ. निलिमा दवणे, वाशिम जिल्हा समन्वयक डॉ. अशोक वाघ, लेफ्टनंट प्रा. ऋषभ डहाके, कमांडन्ट डॉ. नितीन बनसोड आदी उपस्थित होते. कुलगुरू म्हणाले की, १७७ गुणवंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय फेरीत स्थान मिळविले आहे. यशाची पहिली पायरी विद्यार्थ्यांनी ओलांडली आहे. मागील वर्षी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत स्वयंसेवकांनी अनेक पारितोषिके जिंकली होती. सर्वप्रथम प्रमुख अतिथी लेफ्टनंट कर्नल सौरभ मेहरोत्रा यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. प्रास्ताविकतेतून राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांनी विशेषशिबिर चाचणी आयोजनामागील भूमिका विषद केली. संचालन डॉ. निलिमा दवणे यांनी, तर आभार डॉ. विशाल गजभिये यांनी मानले.



# महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढविणे काळाची गरज-महंत पाचराऊत बाबा

## तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचा समारोप



अमरावती/का.प्र.

माणसाला भेडसावणा-या प्रत्येक समस्येचे समाधान महानुभाव साहित्यात आपल्याला दिसून येते. अशा या महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन तिस-या महानुभाव साहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महंत पाचराऊत बाबा यांनी केले.

समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. भैय्यासाहेब मेटकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य अॅड. अमोल ठाकरे, मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे, अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर बाबा, डॉ. अण्णा वैद्य, प्राचार्य डॉ.संतोष आगरकर, परसराज कारंजेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या दोन दिवसीय संमेलनात सकाळी डॉ.अविनाश आवलगावकर, कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ यांची डॉ. कोमल ठाकरे, अधिष्ठाता यांनी प्रकट मुलाखत घेतली. चौथ्या सत्रात महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान या दुस-या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. कोमल ठाकरे यांनी भूषविले. यावेळी डॉ. मिनाक्षी भांदककर, प्रा. संदीप तडस, डॉ. कल्पना मेहरे यांनी पंथाचे आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक योगदान याविषयी शिल्प गुंफले.तर पाचव्या सत्रात महानुभाव दर्शनशास्त्र : स्वरूप व वैशिष्ट्य या तिस-या परिसंवादाचे अध्यक्षस्थान आचार्य महंत अष्टुरकर बाबा यांनी भूषविले. या परिसंवादात महंत श्री सारंगधरबाबा शास्त्री पुसदेकर, नितीनदादा बांधकर यांनी विचार व्यक्त केले.

समारोपीय कार्यक्रमात अॅड. अमोल ठाकरे यांनी महानुभाव पंथाचे तत्वज्ञान ख-या अर्थाने तरुणांपर्यंत पोहोचण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

डॉ.रवींद्र कडू यांनी मराठी भाषा समृध्द करण्यात महानुभाव साहित्याचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी, तर समारोपीय प्रास्ताविक महंत सोनपेठकर बाबा यांनी केले. संमेलनात महानुभाव साहित्य चित्र प्रदर्शनीचे मान्यवरांनी व साहित्यिकांनी अवलोकन केले. कार्यक्रमासाठी भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती, मोर्शी व साहित्यिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

विचारमंथन तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचा समारोप, मान्यवरांची होती उपस्थिती

# महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढवणे काळाची गरज : महंत पाचराऊत बाबा

प्रतिनिधी | अमरावती

'माणसाला भेडसावणाऱ्या प्रत्येक समस्येचे समाधान महानुभाव साहित्यात आपल्याला दिसून येते. अशा या महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढवणे काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महंत पाचराऊत बाबा यांनी केले.

मोर्शी येथील परशुराम पॅलेस येथे आयोजित दोन दिवसीय तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलन कार्यक्रमाच्या समारोपीय सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून पाचराऊत बाबा यांची उपस्थिती होती. तर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रवींद्र कडू, डॉ. भय्यासाहेब मेटकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य ॲड.अमोल ठाकरे, मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे, अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर बाबा, डॉ. अण्णा वैद्य, प्राचार्य डॉ. संतोष आगरकर, परसराज कारंजेकर उपस्थित होते. महानुभाव अध्यासनाच्या कार्याची व्याप्ती त्यांनी विषद केली. या संमेलनात मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांची अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे, यांनी प्रकट मुलाखत घेतली. चौथ्या सत्रात महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान या दुसऱ्या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. कोमल ठाकरे यांनी भूषवले होते. या वेळी डॉ. मीनाक्षी भांदककर, प्रा. संदीप तडस, डॉ. कल्पना मेहरे यांनी पंथाचे आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक योगदान याविषयी शिल्प गुंफले. तर पाचव्या सत्रात महानुभाव दर्शनशास्त्र : स्वरूप व वैशिष्ट या तिसऱ्या परिसंवादाचे अध्यक्षस्थान आचार्य महंत अष्टुरकर बाबा यांनी भूषवले होते. या परिसंवादात महंत श्री सारंगधरबाबा शास्त्री पुसदेकर, नितीन बांधकर यांनी विचार व्यक्त केलेत. या समारोपीय कार्यक्रमात ॲड. अमोल ठाकरे यांनी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान खऱ्या अर्थाने तरुणांपर्यंत पोहोचण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

डॉ. भय्यासाहेब मेटकर यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. डॉ. रवींद्र कडू यांनी मराठी भाषा समृद्ध करण्यात महानुभाव साहित्याचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद केले. यादरम्यान संमेलनात महानुभाव साहित्य चित्र प्रदर्शनाचे मान्यवरांनी व साहित्यिकांनी अवलोकन केले. कार्यक्रमासाठी भारतीय महाविद्यालय, येथील प्राध्यापक, विद्यार्थी, श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती व साहित्यिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.



मोर्शी येथील परशुराम पॅलेसमध्ये आयोजित तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाला व्यासपिठावर उपस्थित मान्यवर.

## महानुभाव अध्यासन केंद्राच्या वतीने सहकाऱ्यांचा केला सन्मान

याप्रसंगी साहित्य संमेलनाच्या दोन दिवसीय यशस्वी आयोजनाबद्दल सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समितीचे प्रमुख राजेश ठाकरे व सर्व सहकाऱ्याचा प्रमाणपत्र देऊन महानुभाव अध्यासन केंद्राच्यावतीने सन्मान केला. त्याचबरोबर भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांनाही सन्मानित केले. समारोपीय प्रास्ताविक महंत सोनपेठकर बाबा यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी केले.

The Hitavada
THE PEOPLE'S PAPER • SINCE 1911

# 'Young poets' verses reflect their own emotional world as well as social realities'

■ Amravati Bureau
AMRAVATI, Sept 24

THE 9th edition of the 'Kavi Keshavsut Poetry Competition', organised by Postgraduate Department of Marathi, Sant Gadge Baba Amravati University, received an enthusiastic response, with young poets presenting verses reflecting social realities, human emotions, the desire for change and contemporary issues.

The competition was organised at the Bharat Ratna Dr Babasaheb Ambedkar Audio-Visual Hall on the occasion of World Brotherhood Day. As many as 33 students from various affiliated colleges and academic departments of the university participated in the event.

Urvi Hemant Khadke of Hanuman Vyayam Prasarak Mandal, Amravati, won the first prize, while Atmaja Suresh More of Smt Radhadevi Goenka Mahila Mahavidyalaya, Akola, stood second. Pranav Kore of Hanuman Vyayam Prasarak Mandal, Amravati, bagged the third position. The winners were presented cash prizes of Rs 3,000, Rs 2,000 and Rs 1,500, respectively, along with mementoes and certificates. All participants received certificates of participation.

The poems presented during the competition covered themes including human relationships, personal experiences, social inequality, human joys and sorrows, women's lives, environment, changing values and contemporary social issues. Variety of content, precise use of language, poetic expression, imagination and confident presentation added colour to the competition.

In her presidential address, Dr Mona Chimote, Head of the Marathi Department and Dean of the Faculty of Humanities, said poetry is a creative language that gives expression to the human heart. She said the competition was organised to familiarise students with the rich tradition and diverse forms of Marathi poetry, develop interest in poetry and provide a platform for their creative talent. Poetry reading and writing, help develop linguistic awareness, sensitivity and a critical outlook, said Chimote.

Dr Avinash Asnare, Registrar, while inaugurating the event, said poetry is an effective medium for giving artistic expression to human experiences, emotions and thoughts. He urged students to participate enthusiastically in such creative activities and give shape to their expression.

Judge Prof Dr Suvarna Gadge, Head of the Marathi Department at Shri Shivaji Arts and Commerce College, said poetry derives its beauty from the harmonious blend of thought and emotion. She highlighted content and expression, language, imagery, rhythm, emotional appeal and presentation as important elements of poetry.

Anant Nandurkar, renowned poet and ghazal writer and judge of the competition, said poetic creation is a discipline rooted in sensitivity. He observed that the poems of young writers effectively reflected both their personal emotional worlds and an awareness of social realities and human suffering.

Gadge and Nandurkar judged the entries on the basis of content, linguistic beauty, poetic quality, imagination, emotional impact, presentation and social relevance.

Prof. Dr Hemant Khadke compered the poetry sessions, while Prof. Abhijit Ingle conducted the inaugural and prize distribution ceremonies. Prof. Ankita Jain proposed a vote of thanks at the inaugural session, while competition coordinator Prof. Dr Pranav Kolte delivered the vote of thanks at the prize distribution ceremony.

Dr Mona Chimote, Dr Madhav Putwad, Dr Pranav Kolte and students of the Postgraduate Department of Marathi took efforts for the successful organisation of the competition.



Dr Mona Chimote and others with winner students.

सोलापूर
# तरुण भारत

# अमरावती विद्यापीठाला राज्यस्तरीय पुरस्कार

## महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेकडून कौतुक



पुरस्कार स्वीकारताना कुलगुरू डॉ. बारहाते

अमरावती, २४ सप्टेंबर

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने ऊर्जा संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून, विद्यापीठाला ऊर्जा संवर्धनासाठी १६ वा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था अमरावती विभागाचे महाव्यवस्थापक अभिजित हिंगे यांनी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांना सदर पुरस्कार प्रदान केला.

पुरस्कार स्वीकारतेवेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सी. ए. पुष्कर देशपांडे, कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे, उपअभियंता (विद्युत) राजेश एडले, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, कनिष्ठ अभियंता आकाश सोळंके तथा अभियांत्रिकी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सौर ऊर्जेसाठी विद्यापीठ परिसरात ५७६ किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यात आला असून या माध्यमातून संपूर्ण विद्यापीठ परिसरात स्वच्छ ऊर्जेचा पुरवठा करण्यात येतो. पारंपरिक विद्युत उपकरणांपैकी ६५ टक्के उपकरणे स्टार लेबल आणि एनर्जी सेव्हर उपकरणांमध्ये बदलण्यात आली आहेत. विद्यापीठ परिसरात ९० टक्के एलईडी स्ट्रीट लाईट्स आहे. ऊर्जाबचतीसाठी ५० टक्के सिलिंग फॅन हे ऊर्जा बचत करणाऱ्या बीएलडीसी सिलिंग फॅनमध्ये बदलण्यात आले आहे. परिसरातील कार्बन उत्सर्जन लक्षात घेता वरील सर्व उपायांमुळे दरवर्षी सुमारे ६०० टन कार्बन उत्सर्जन सद्यःस्थितीत नियंत्रित केले जात आहे.

विद्यापीठातील विविध विभागांच्या एकूण वीज मागण्यांपैकी ५५ टक्के वीज ही परिसरात उभ्या असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे पूर्ण केली जाते. या व्यतिरिक्त पाणी व वृक्ष संवर्धनामध्ये विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी केली असून, भूजल पुनर्भरण करण्यासाठी २ मोठी जलाशये आणि ६ शेततळी तयार करण्यात आली आहेत. २० मोठ्या इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग बसविण्यात आले आहे. या माध्यमातून परिसरातील सर्व विभागांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात येतो.

वृक्ष संवर्धनामध्ये विद्यापीठाने भरीव कामगिरी केली असून, २.७५ लाख झाडे परिसरात लावण्यात आली आहे. तसेच झाडांची पाने, जैविक कचरा यापासून खत निर्मिती करण्यासाठी कंपोस्ट खड्डे देखील तयार करण्यात आले आहे. या विविध पर्यावरणपूरक आणि ऊर्जा संवर्धनाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेतर्फे हा मानाचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. याप्रसंगी विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(तभा वृत्तसेवा)

# दैनिक भास्कर

# युवा महोत्सव के 'युवा संस्पर्श' में छात्र कलाकारों ने बिखेरी प्रतिभा




अमरावती| संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के युवा महोत्सव-2026 'युवा संस्पर्श' का आयोजन बुलढाणा स्थित राजर्षि शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंग के परिसर में किया है। महोत्सव के पहले और दूसरे दिन अमरावती संभाग के पांचों जिलों के विभिन्न महाविद्यालयों से पहुंचे हजारों युवा विद्यार्थी कलाकारों ने उत्स्फूर्त सहभागिता दर्ज कराई।महोत्सव परिसर में कला, संस्कृति और विविध कलाप्रकारों की प्रस्तुतियों से चैतन्यमय वातावरण बना हुआ है



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

### मार्गदर्शक



**श्री जिष्णू देव वर्मा**

मा. राज्यपाल तथा कुलपती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र-कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### प्रकाशक



**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### संपादक



**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ